॥ संतांचीं उच्छिष्ट बोलिलों उ…

# महाराष्ट्राचा राजकीय प्रांत

## ( Governor's Province )

भाषिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक व पारंपरिक इतिहासाधारें सांगोपांग व सोपपत्तिक विवेचनपूर्ण महाराष्ट्र राजकीय प्रांत निर्मितीसाठीं क्षेत्र व जनसंख्या निवेदन.

लेखक

**शंकर रामचंद्र शेंडे**

बृहन्महाराष्ट्रीय कार्यालय, सांगली ( दक्षिण महाराष्ट्र )

---

**आपला धंदा, व्यापार, चरितार्थ महाराष्ट्रांत चालला आहे ना ?**

मग आपण मुंबई, नागपूर, भंडारा, गोवा, कारवार, औरंगाबाद, बीदर, कोठेंहि व्यवसायांत असा, आपली कार्यभूमि महाराष्ट्र आहे आणि आपण महाराष्ट्रीय आहांत. स्वायत्त भरतखंडाच्या संघ राज्यांत ( Union Government ) त्याचा एक घटक-महाराष्ट्र राजकीय प्रांत ( Governor's Province ) होणार आहे व त्यामुळें आपण आपल्या कर्मभूमीचे स्वयंप्रभु व स्वयंनिष्ठ नागरिक होणार आहांत. आपल्या महाराष्ट्राला स्वतंत्र प्रांताची सत्ता व प्रतिष्ठा येणार असल्यानें आपल्या व्यवसायाला महत्त्वाकांक्षेला आणि कर्तबगारीला चौफेर प्रोत्साहन मिळणार आहे. तसेंच

भरतखंडाच्या राजकीय प्रपंचांत एक स्वतंत्र घटक म्हणून मानाचें स्थान व प्रतिष्ठेचें पान लाभणार आहे.

जी कर्मभूमी आपणास जीवन देत आहे; जिच्या कुशींतून आपणास संपत्ति, ऐश्वर्य, सन्मान, सुख आणि समाधान लाभत आहे, त्या आपल्या महाराष्ट्राला स्वतंत्र प्रांताचें स्थान मिळविण्यासाठीं आपलें बळ तिला पाहिजे आहे तें, आपण तिचे उपकार स्मरून तिला देणें, आपलें कर्तव्य आहे; तें आपण चुकतां नये.

---

## माझ्या कार्याचा अत्यल्प बयाणा

गेलीं १३ वर्षें मी चालविलेल्या कार्याच्या निमित्तानें अनेक कारणामुळें ज्यांच्या ज्यांच्याशीं संबंध आला त्यांच्या मनांत मी कांहीं अपेक्षा उत्पन्न केल्या आहेत; त्यांचा अत्यल्प बयाणा या पुस्तिकेच्या रूपानें मी महाराष्ट्राला सादर करीत आहें. हा बयाणा "महाराष्ट्र भाषेच्या चार अवस्था" हें पुस्तक प्रसिद्ध करून मी पुरा करणार आहें.

या पुस्तिकेंतील विवेचन पद्धति, शास्त्रीय व व्यावहारिक दृष्टीनें केलेली विषयाची मांडणी, साधार विधानें आणि बुद्धिगम्य व तर्कशुद्ध अनुमानें, इतक्या दुव्यांच्या साखळीनें प्राचीन इतिहासांतून अर्वाचीनाची घडण कसकशी होत आली याच्या प्रतिपादनावरून अवलोकन शक्ति व अभ्यासांतील सूक्ष्मता व दोहोंची संगति वाचकांच्या प्रत्ययास येईल, असा भरंवसा वाटतो. आणि हाच प्रत्यय माझ्या पुस्तकाच्या प्रकाशनाचा पुरस्कार करील असा मला विश्वास आहे.

---



मुद्रक—केशव तातोबा शेट्ये, तत्त्वविवेचक प्रेस, भायखळा, मुंबई.

प्रकाशक—**श्रीकृष्ण दामोदर कुळकर्णी, केमकर आणि मंडळी,**
पब्लिशर्स, बुकसेलर्स व स्टेशनर्स, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई नं. ४.

**मूल्य एक रुपया.**

भाषिक महाराष्ट्र ग्रंथावली

पुष्प पहिलें

# महाराष्ट्र भाषेच्या चार अवस्था

लेखक

**शंकर रामचंद्र शेंडे**

बृहन्महाराष्ट्रीय कार्यालय, सांगली ( दक्षिण महाराष्ट्र )

महाराष्ट्र भाषेच्या जन्मापासूनच्या–जन्मकारणादि अनेक अंगोपांगाच्या विवेचनाच्या पार्श्वभूमीवर वैचारिक आंदोलनांनीं घडवून आणलेलीं, तिचीं चार अवस्थांतरें या ग्रंथद्वारें प्रथमच महाराष्ट्रसारस्वताच्या दरबारांत प्रकटविलीं जाणार आहेत.

## महाराष्ट्र भाषेच्या नांवांचा इतिहास

या ग्रंथांतील ह्या उपप्रकरणामुळें वरील इतिहासकथनाला पुष्टि मिळालेली आढळेल व हें उपप्रकरण अगदींच अभिनव आहे हें मान्य करावें लागेल.

भाषेच्या प्रपंचाच्या उभारणीला व अवस्थांतरें होण्याला महाराष्ट्राचें सामाजिक, आध्यात्मिक व राजकीय जीवन कसें कारणीभूत झालें हें प्रथम याच ग्रंथांत जगापुढें येत आहे. संशोधनाचीं क्षेत्रें किती विविध आहेत, संशोधन–विषय कोणते होऊं शकतात व सूक्ष्मदृष्टि कशी वापरावी लागते, याची हा ग्रंथ वाचून पूर्ण व स्पष्ट कल्पना येईल.

**या ग्रंथाचें हस्तलिखित प्रकाशन–साधनाची आराधना व मार्गप्रतीक्षा करीत आहे.**

—प्रकाशक

# पार्श्वभूमि

" महाराष्ट्राचें भौगोलिक क्षेत्र " सांगणारा ठराव नागपूरच्या ( १९३३ ) साहित्यसंमेलनांच्या ठरावसमितीनें अमान्य केल्यामुळें त्यावर संमेलनाचें शिक्का-मोर्तब होऊं शकलें नव्हतें तरी पण त्याच वेळीं केसरीच्या २६–१२–३३ अंकांतील एतद्विषयक माझा लेख मात्र तेथेंच सर्वांना आवडला. लेख आवडला पण ठराव होऊं नये असें वाटलें, याच्या मागची मनोवृत्ति अनेकांशीं त्यावेळीं चर्चा करतांना अशी असावीशी आढळली कीं इतक्या उच्च पातळीवर पोचण्याइतकी महाराष्ट्राची प्रकृति सुदृढ नव्हती अथवा माझ्यासारख्या अगदींच सामान्य माणसानें सांगितल्या-मुळें विषय लक्षणीय वाटला नसावा. कारण कांहींहि असो, माझ्या मनांत मात्र त्यावेळेपासून एक अढी ठाण मांडून बसली कीं महाराष्ट्र संघरूप झाल्यावांचून त्याची शक्ति व बुद्धि विकसणार नाहीं आणि उत्कर्ष व वैभवप्राप्तीचा मार्ग निष्कंटक होणार नाहीं, सार्वभारतीय क्षेत्रांतील त्याचें गेलेलें स्थान पुन्हा मिळणार नाहीं, आज दृग्गोचर होत असलेली स्वबांधवांतील परस्परनिरपेक्षता व बंधुभावाची अजाणता आणि महाराष्ट्रियत्वाच्या उच्च व समान भूमिकेच्या अभावामुळेंच निरनिराळ्या पक्षोपक्षाच्या अधिष्ठानावरून स्वकीयांत माजलेलीं रणें व भेद नाहींसे होणार नाहींत व महाराष्ट्राची संघशक्ति व संघबुद्धि प्रभावी ठरणार नाहीं. यासाठीं महाराष्ट्राचें क्षेत्र, इतिहास व परंपरा यांचें निश्चित, शास्त्रशुद्ध आणि यथार्थ ज्ञान व्हावयास पाहिजे म्हणून प्राचीन व अर्वाचीन माहिती मिळविण्याचें काम हातीं घेतलें.

इतिहास ज्ञानासाठीं ग्रंथावलोकन व वस्तुस्थितिनिरीक्षणासाठीं पर्यटन चालू झालें व या दोहोंची संगति लावण्यासाठीं व शास्त्रशुद्धता पारखण्यासाठीं संशोधन करणें क्रमप्राप्त होतें, तेंहि चालू केलें. शास्त्री–पंडितांचें मार्गदर्शन व सल्लामसलत हींहि या माझ्या ज्ञानसंपादनाला सहाय्यकारी झालीं.

पहिल्या पांच वर्षांच्या परिश्रमानंतर असें आढळलें कीं सर्वांगपूर्ण इतिहास Encyclopaedic Gazetteer of Maharashtra लिहिला गेला पाहिजे. या इच्छेचें फळ " भाषिक महाराष्ट्र " नांवानें काम चालू असून त्यासाठीं एक " मंडळ " निर्माण होत आहे. त्या कामीं मला ज्ञानदान, अर्थदान व प्रोत्साहनदान शास्त्री, पंडित, धनिक, मित्र, संस्था व संस्थानें यांच्याकडून वेळोवेळीं होत आल्यामुळेंच या कार्याला इतकें दृश्य स्वरूप प्राप्त झालें कीं, संशोधित विषयांचें

प्रबंध व तदनुरूप भूचित्रें तयार झालीं आहेत. "महाराष्ट्र भाषेच्या चार अवस्था" नांवाच्या ग्रंथाचा हस्तलेख लिहून तयार आहे व सुमारें ४० संशोधित विषय पूर्ण होण्याची मार्गप्रतीक्षा करीत आहेत.

या सर्व पर्यवसानाचें मूळ जे "महाराष्ट्राची भौगोलिक व्याप्ति" ठरविण्याचा प्रयत्न, ती व्याप्ति निश्चित करणारें साहित्य मिळविल्यानंतर त्यांची मांडणी करतानां मूळची साहित्यिक दृष्टि बाजूला ठेऊन व्यावहारिकदृष्ट्या "राजकीय प्रांत" या नांवानें सांगणें युक्त वाटलें व त्याप्रमाणें गेल्या ८ वर्षांत ३ वेळां प्रयत्न केला पण त्याला यश आलें नाहीं. श्री. माडखोलकरांची बेळगांव संमेलनाध्यक्ष म्हणून निवडणूक झाल्यानंतर त्यांनीं गेल्या एप्रीलमध्यें संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाला चालना देण्याचें ठरवून त्या दिशेनें प्रयत्न करतांना माझ्याकडील माहिती मागितली व ती मी त्यांना देण्यासाठीं बेळगांवास नेली होती, ती तेथें स्थापन झालेल्या "संयुक्त महाराष्ट्र समिति" च्या मुंबई येथें भरणाऱ्या अधिवेशनाच्या निमित्तानें महामहोपाध्याय प्रो. द. वा. पोतदार यांच्या प्रोत्साहनामुळें प्रसिद्ध करीत आहें.

या पुस्तिकेंत फक्त या विषयाचें भाषिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक व पारंपारिकदृष्ट्या भौगोलिक क्षेत्र कथन झालेलें आहे. कथनाला अनुलक्षून भूचित्रें दिलीं आहेत, तीं प्रतिपादनाला बोधकता आणतील असा भरंवसा आहे. हा विषय प्रथमच पुढें येत असावा असे वाटतें. त्यामुळें त्यांत अपुरेपणा राहणें अपरिहार्य आहे व मला त्याची जाणीव आहे.

या पुस्तिकेंतील विषयसमर्थनार्थ जे आधार घेतले आहेत ते त्या त्या शास्त्रांतील पंडितांनीं तपासून चुका असतील त्या माझ्या नजरेस आणण्याची कृपा करावी. त्या चुका मी तात्काळ सुधारीन. मतें माझीं असलीं तरी त्यांतहि अवश्य तेथें मी तीं बदलण्यास तयार आहें. आग्रह माझ्या वैय्यक्तिक मतासाठीं धरणार नाहीं पण महाराष्ट्राचें बिनचूक व यथातथ्य इतिहास व सद्यःस्थिति–चित्रण व्हावें व अखंड आणि एकसांधी महाराष्ट्रप्रांत निर्माण व्हावा याबद्दल मी नुसता आग्रहच धरणें नव्हे तर अट्टाहास करणें माझें नियत कर्तव्य मानतों.

ही पुस्तिका छापून प्रसिद्ध करणें माझ्यासारख्या निर्धनाला अशक्य होतें. श्री. वा. गो. तांबवेकर, बी. ए., एल्एल्. बी., संपादक समर्थ, यांच्या समाजहितबुद्धि, प्रसंगौचित्य जाणण्याची व साधण्याची तत्परता आणि कार्यनिष्ठा या गुणांमुळेंच माझ्या या पुस्तिकेला प्रथम आपल्या मासिकांत प्रसिद्ध करून जगापुढें

आणिली व नंतर पुस्तकरूपानें प्रकट होण्यास त्यांचेंच सक्रिय सहाय्य कारणीभूत आहे. त्यांनीं आपलेपणानें व कर्तव्यबुद्धीनें हें प्रसिद्धीकरण अंगावर घेतलें नसतें तर हस्तलिखित भूमिगत राहिलें असतें. मी त्यांचा ऋणी आहें.

या पुस्तिकेच्या मुद्रणकार्यासाठीं मला पुढें ढकलण्याचें श्रेय सांगलीचे रा. सा. पु. श्री. मोकाशी व रा. सा. वि. ह. केळकर, श्री. रामभाऊ भिडे, यांच्या आर्थिक प्रोत्साहनाला आहे. श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर, ज्यांचें मला गेलीं १० वर्षें आर्थिक व बौद्धिक सहाय्य आणि पाठपुरावा व आश्रय आहे, ते यावेळीं माझ्या पाठीशीं उभे असणार नाहींत हें कसें घडेल ? मुंबईचे श्री. काकासाहेब तांबे, हेहि यावेळी आर्थिक सहाय्य करण्यास पुढें सरकले आहेत. भूचित्रें तयार करणारे चित्रकार श्री. विद्याधरपंत तुळजापुरकर व श्री. थत्ते यांच्या तत्परतेबद्दल, तत्त्वविवेचक मुद्रणालयानें मी केलेल्या अनेक अडचणी सोसून सुंदर छपाई करून दिल्याबद्दल, पान ३८ मधील भूचित्राचा ठसा केसरीनें वापरण्यास दिल्याबद्दल श्री. केमकर आणि मंडळी पब्लिशर्स यांनीं ही पुस्तिका प्रकाशित केल्याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहें.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या द्वारें घटनासमितीकडून महाराष्ट्राचें सर्व क्षेत्र समाविष्ट असलेला एकावयवी आणि महाराष्ट्राचा एकहि विभाग न गळलेला असा महाराष्ट्राचा राजकीय प्रांत निर्माण होण्यास या पुस्तिकेचा उपयोग झाला व महाराष्ट्रविषयक जी नवीन माहिती मीं येथें संक्षेपानें मांडली आहे, ती सविस्तर जाणून घेण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली म्हणजे या श्रमाचें सार्थक झालें असें मी समजेन.

मुंबई, गुरुपौर्णिमा शके १८६८ ( ख्रिस्ताबाद, १४-७-१९४६ )

## संयुक्त महाराष्ट्र परिषदेचीं आद्य कर्तव्यें

ही पुस्तिका दि. २८-७-४६ च्या अधिवेशनाच्या आधीं प्रसिद्ध व्हावी हा मनोदय विफल झाला, तरी आतां, त्या परिषदेनें " संयुक्त महाराष्ट्र परिषद " ही संस्था निर्माण केली असून तिच्या कामाचा उरक करण्यासाठीं ४ पोटसमित्या नेमिल्या आहेत, आवश्यकतेप्रमाणें आणखीहि निर्माण होण्याचा संभव आहे. यामुळें कामाचा व्याप वाढत राहणार असल्याकारणानें पोट-समित्यांचीं निवेदनें तयार करण्याच्या कामीं या पुढेंच ही पुस्तिका अधिक उपयोगी पडावयाची आहे. मी संयुक्त महाराष्ट्र परिषदेला खालील सूचना करतों, त्यांचा स्वीकार करावा. अखिल महाराष्ट्रियांना उत्कर्ष, वैभव, मान्यता व संपन्नता प्राप्त करून देण्याच्या व भरतखंडाला ललामभूत होण्याच्या दृष्टीनें त्या उपकारक ठरतील.

१ घटना समिति-( Constituent Assembly ) कडून भाषा प्रमुख प्रांत पुनर्रचना करण्याचें तत्त्व मान्य करून व तदनुसार हल्लींच्या ज्या प्रांतांत अनेक भाषाभाषी लोक आहेत ते प्रांत मोडून नवे भाषाप्रमुख प्रांत निर्माण करवून घ्यावेत.

२ पण असें करतांना एका संस्कृतीचे पण दोन भाषा बोलणारे समाज एकाच प्रांतांत राहूं इच्छितील तर त्यांना एकाच प्रांतांत राहूं द्यावें. अशा प्रांतांत दोन भाषा नांदल्यास हरकत येऊं नये.

३ वरील छेद १ व २ मधील आपलें मागणें शक्य तर आंध्र, कर्नाटक, गुजराथ, तामीळ, कोसल, केरळ या भाषांच्या पुढाऱ्यांसह सांघिकपणें मांडलें जाणें अधिक परिणामकारक होईल; तसा प्रयत्न करावा.

४ ना. डॉ. जयकरांच्या अध्यक्षतेखालील जी घटनासमिति निर्माण केली आहे, ती ज्या महाराष्ट्र भाषाभाषी प्रदेशांचें एकीकरण व्हावें म्हणून सांगणार, त्यांत हल्लींच्या व्यवस्थेप्रमाणें बहुसंख्य महाराष्ट्र भाषाभाषी जिल्हे जे या पुस्तिकेच्या पान ३२ व ३३ वर ( अ ), ( आ ) ते ( ऊ ) छेदांत दिले आहेत, त्याबद्दल वाद होणार नाहीं. पण, पान ३९-३८ वरील छेद ( ए ), ( ऐ ), ( ओ ), ( अः ), ( क ) व (घ) अखेर या भागांतील कोणता भाग महाराष्ट्राचा म्हणतां येतील हें ठरविणें कठीण आहे. स्थानिक मंडळींच्या सहाय्यानें पूर्वापार इतिहास, सामाजिक, व धार्मिक चालीरीति, संस्कार इत्यादिकांवरून त्यांचें ऐक्य अथवा द्वैत ठरवावें लागणार आहे. या संबंधीची माहिती पुस्तिकेंत निरनिराळ्या ठिकाणीं आढळेल. या

कामासाठीं व वरील प्रत्येक भागासाठीं एकएक स्वतंत्र पोट समिति तिनें निर्माण करावी व तेथल्या महाराष्ट्रेतर समाजांचें सहकार्य मिळालें तर घ्यावें.

५ वऱ्हाडच्या प्रश्नासाठीं स्वतंत्र पोट समिति नेमावी लागेल.

६ संस्थानिकांच्या व पूर्तुगिझांच्या सत्तेखालील महाराष्ट्राचा प्रदेश आजच महाराष्ट्राच्या राजकीय प्रांताला जोडतां येणार नाहीं. निरनिराळ्या राजसत्तांखालीं गेल्यामुळें अखंड महाराष्ट्राचे तुकडे होऊन त्यांचे निरनिराळे हितसंबंध उत्पन्न झाल्यामुळें आज वऱ्हाड, नागपूर, मऱ्हाटवाडा व गोवा येथून विसंवादी सूर ऐकूं येतात; मंगळूर, डांग भाग व बारवाणी भाग तर घोर अज्ञानांतच आहेत. हे विसंवाद व अज्ञान नाहींसें करून त्यांच्यांतील भाषिक व सांस्कृतिक विसंगति घालवून सर्व महाराष्ट्रियांची एकात्मता घडवून आणणें, भावी महाराष्ट्रप्रांत एकरूप होण्याच्या दृष्टीनें अत्यवश्यक आहे. या सर्व विभक्त भागासाठीं एकएक समिति नेमिली पाहिजे.

७ कॉंग्रेस व हिंदुमहासभा व इतर संस्था ज्यांनी मराठी मध्यप्रांत, वऱ्हाड, मुंबई शहर व महाराष्ट्र अशा निरनिराळ्या पोट समित्या केल्या असतील त्यांची एकता करून घेऊन प्रांतिक ऐक्याची मुहूर्तमेढ त्यांच्याकडून रोवविली पाहिजे.

८ सरहद्द भागांत जनमतनोंदणी ( referendum ) घ्यावी लागेल त्यासाठीं प्रचार समिति नेमावी.

९ महाराष्ट्र राजकीय प्रांत निर्माण होण्यास कालावधी लागेल म्हणून आणि त्याची पूर्वतयारी म्हणून मुंबईप्रांतांतील कुलाबा, रत्नागिरी, ठाणें, सोलापूर व मुंबई उपनगर हे जिल्हे Central Division मध्यें आणि मध्यप्रांतांतील भंडारा जिल्हा नागपूर डिव्हीजनमध्यें कॉंग्रेस मंत्रिमंडळाकडून घालून घ्यावेत.

**१० Union Government मध्यें महाराष्ट्रप्रांत निर्माण व्हावयाचा आहे, (१) त्याचें क्षेत्र अखंड, अविभाज्य व एकावयवी राहिलें पाहिजे, त्यांतील कोणताहि भाग वगळला जाऊं नये, (२) सर्व हितरक्षक अशी महाराष्ट्राची शासनसत्ता स्वयंपूर्ण व समर्थ बनेल, अशी दक्षता संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें घेतली पाहिजे. तींत कांहीं वैगुण्यें राहिलीं जाण्याचा संभव दिसतांच महाराष्ट्राचा विरोध जागा करून तीं वैगुण्यें नाहींशीं करण्याची जागरूकता संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें राखली पाहिजे.**

**मुंबई, श्रावणी पौर्णिमा, शके १८६८; दि. १२ ऑगस्ट, १९४६.**

**शं. रा. शेंडे**

# महाराष्ट्र राजकीय प्रांताचीं प्रवेशद्वारें

## (१) घटना समिति आणि महाराष्ट्र राजकीय प्रांत

Union Government ची घडण होऊं लागेल, त्याचा एक भाग भाषावार प्रांतरचना करणें हा होईल; त्यावेळीं महाराष्ट्राचा विचार निघणार. या प्रसंगीं जे महाराष्ट्रीय प्रतिनिधि मुंबईप्रांत, मध्यप्रांत वऱ्हाड व संस्थानें यांच्या वतीचे तेथें असतील त्यांनीं आपली कर्तव्यबुद्धि पराजून सज्ज असलें पाहिजे; महाराष्ट्र विषयक सर्व माहिती योग्यवेळीं सादर केली पाहिजे, इतरांना ती पटविली पाहिजे; इतकी दक्षता घेतली तर अखंड, एकसांधी व एकावयवी महाराष्ट्र प्रांत तयार होईल. त्यांचे परिश्रमच महाराष्ट्राची अखेरची घडण करूं शकणार आहेत. कारण ही समिति राजसत्तानिर्मित अधिकृत आणि अखेरचा निर्णय देणारी आहे.

महाराष्ट्रीय जनतेनें स्वहितरक्षणार्थ सावधानतेनें घटनासमितीस सहाय्य केलें पाहिजे. बेळगांवास स्थापन झालेल्या "संयुक्त महाराष्ट्र समिती"च्या मुंबई येथील दि. २८-७-१९४६ च्या पहिल्या अधिवेशनानें संयुक्त महाराष्ट्र परिषद् अधिक सर्वंकष व सायुध अशी केली आहे. ही संयुक्त महाराष्ट्र परिषद् जनताभिमुख असणार. जनतेचें म्हणणें व मागणें या सं. म. परिषद्द्वारा घटना समितीपुढें ठेविलें जाणार आहे. तसेंच जनमत तयार करणें हेंहि या सं. म. परिषदेचें दुसरें काम आहे. अशी ही दुधारी व दुरंगी राहणार आहे.

घटना समितींत महाराष्ट्राचा प्रश्न प्रासंगिक म्हणून दुय्यम आहे व त्यामुळें तो कालावधीनें केव्हांतरी निघणार, त्या उलट सं. म. परिषदेचें काम महाराष्ट्रा-पुरतेंच एकमेव असल्यानें तिचें काम आजपासून सततचें व महाराष्ट्रविषयक राहणार आहे. अशा या दोन्ही समित्या परस्परपूरक आहेत.

सं. म. परिषद् ही महाराष्ट्राची बुद्धि, शक्ति व वाणी राहणार आहे, म्हणून अखिल महाराष्ट्राचें सर्व सांघिकबळ तिच्यांत सामावून तिला एकमेव, पूर्ण प्रातिनिधिक व समर्थ बनविणें यापुढें महाराष्ट्रियांचें कर्तव्य आहे. महाराष्ट्रविषयक अनेक प्रश्नांची चर्चा घटना समितींत व्हावयाची आहे. त्यावेळीं त्या सर्व विषयांतील तज्ज्ञांनीं आपापल्या ज्ञानमंजूषा सं. म. समितीच्या द्वारें घटनासमितीस सादर केल्या पाहिजेत, म्हणजेच संयुक्त महाराष्ट्राचा राजकीयप्रांत (Governor's Province) निरपवादपणें बनला जाईल.

## ( २ ) भावी महाराष्ट्रप्रांताची घडण जिच्याकडून व्हावयाची त्या घटना समितीचें जातक

भरतखंडाचें शासनविधान घटनासमिति बनविणार हें खरें असलें तरी तिचें अधिकारक्षेत्र अनिर्बंध आहे, मर्यादित आहे कीं ती स्वयंप्रभु आहे? त्रिमंत्र्यांनीं घालून दिलेले प्रांतांचे गट हे वज्रलेप आहेत कीं ते नवे बनवितां येतील अथवा एक एक प्रांत स्वतंत्र गट राहूं शकेल? त्रिमंत्र्यांनीं जुनेच प्रांत निर्दिष्ट केले आहेत व त्यांची संख्या मर्यादित आहे; त्यांचें क्षेत्र व संख्या घटना समितीला कमीजास्त करतां येईल काय? म्हणजे तशी घोषणा नसतांना भाषाप्रमुख प्रांत बनवितांना पूर्वीचे प्रांत नाहींसे करतां येतील काय? एका गटांतील क्षेत्राला दुसऱ्या गटांत घालतां येईल काय? ज्या संस्थानांत एकाहून अधिक भाषा भाषकांचे विभाग आहेत त्या विभागांना ब्रिटिश सत्तेखालच्या त्याच भाषाविभागांत सामील करतां येईल काय? तसेंच हल्लींच्या ब्रिटिश सत्तेखालील दोन प्रांतांत विभागल्या गेलेल्या विभागांना एकसांधी नवा प्रांत बनवितां येईल काय? इतक्या गोष्टी करण्याचें स्वयंप्रभुत्व घटना समितीस नाहीं असें ठरलें जाऊन राष्ट्रसभेनें घटनासमितीशीं असहकार पुकारला तर राष्ट्रसभेचे प्रतिनिधी तींतून उठून येतील पण बाहेरचे जे प्रतिनिधि राष्ट्रसभेद्वारा निवडून आले त्यांना राष्ट्रसभेचा हा निर्णय योग्य वाटला नाहीं म्हणून घटनासमितींत राहतां येईल कीं राष्ट्रसभेच्या प्रतिनिधीबरोबर उठून जावें लागेल? या प्रतिनिधीशिवाय शासनविधान तयार होईल तें भरतखंडाच्या मानगुटीवर लादलें जाईल काय? या शासन विधानांत आपल्या जिव्हाळ्याचा प्रस्तुत प्रश्न जो भाषाप्रमुख प्रांत–घडण तिच्या चर्चेंत अग्रस्थान मिळेल काय? राष्ट्रसभा अथवा मुस्लिम लीग आरंभीं अथवा मध्यंतरींच असहकार करील तर घटना समिती स्थगित होईल काय? घटनासमितीचें शासनविधान पार्लमेंटला अमान्य करतां येईल काय अथवा त्यांत बदल करतां येईल काय? अखेरच्या घटकेपर्यंत यापैकीं काय होईल व काय नाहीं याचें जातक यावेळीं कोण वर्तवूं शकेल? भरतखंडाच्या शासनविधानांत भाषाप्रमुख प्रांतरचना हा प्रश्न कमी महत्त्वाचा असल्यानें त्यासाठीं शासनविधान अडवून ठेवतां येईल काय? त्रिमंत्र्यांच्या मूळ घोषणांचें त्यानंतरच्या पुरस्त्यांनीं बदलत चाललेलें स्वरूप पाहतां या शंका उद्‌भवतातच.

## (३) आजचा आणि उद्यांचा महाराष्ट्र

नवीन दृष्टीनें भाषाप्रमुख प्रांतांची घडण करतांना महाराष्ट्राचा प्रांत बनविला जाणें अपरिहार्य आहे म्हणजे जुने प्रांत विसकटले जाऊन नव्या प्रांतांची घडण होणार आहे. यांतहि पुन्हा महाराष्ट्र :—( १ ) ब्रिटिश सत्ता ( २ ) संस्थानी सत्ता व ( ३ ) पूर्तूगीझ सत्ता, या तीन सत्ताखालीं विभागला गेला आहे. ब्रिटिश सत्तेमधील तीन गव्हर्नरच्या ( मुंबई, मध्यप्रांत–वऱ्हाड व मद्रास ) अमलाखालील प्रदेशांचा प्रथम व आपोआप महाराष्ट्र होईल, म्हणून त्याला **आजचा महाराष्ट्र** म्हटलें आहे. याचें कारण ब्रिटिश सरकार आज सत्तादान करण्यास सिद्ध झालें आहे. पण महाराष्ट्राचे जे भाग संस्थानांच्या आधिपत्याखालीं आहेत, त्यांचा अधिकारन्यास करण्यास संस्थानें कितपत तयार होतील हा प्रश्न असला तरी, भरतखंडाची केंद्रसत्ता स्थापित होऊन त्याचा अम्मल सुरू होईल, राज्यव्यवस्थेची घडी जसजशी सुस्थित बसूं लागेल व जनता परिस्थितीचें सम्यक्ज्ञान आकलन करण्यास, सारासार विचार करण्यास व तारतम्य जाणण्यास समर्थ होईल, त्याप्रमाणांत संस्थानांनासुद्धां केन्द्रसत्तेंत विलीन होण्याची बुद्धि सुचेल. आजसुद्धां संस्थानी कारभारांत प्रजेचा हात असावा या मागणीच्या पुढें जाऊन संस्थानें नजीकच्या ब्रिटिश प्रांतांत सामील करावींत अशी मागणी संस्थानी प्रजा करीत आहे. याच दिशेनें महाराष्ट्रीय संस्थानांनीं आपापली व्यक्तिगत सत्ता एका गटराज्यांत विलीन करण्याची सुबुद्धि दर्शविली आहे. हा एकीकृत वा संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याला शुभ शकून समजला पाहिजे. अद्यापि कोल्हापूर या गटांत येऊनसुद्धां आपलें अस्तित्व निराळें राखूं इच्छित असल्याची बातमी आहे. निजामसुद्धां भरतखंडाच्या नव्या घडणींत आपला स्वतंत्र गट ( unit ) राखूं इच्छितो, असें नुकतेंच अनधिकृतपणें प्रसिद्ध झालें आहे. भरतखंडाची सार्वभौमसत्ता धारण करणारे इंग्रज जर सर्वसत्तात्याग करण्यास सिद्ध आहेत तर त्या सार्वभौमाच्या दृष्टिपातानुसार मागेंपुढें होणाऱ्या संस्थानिकांना अखिल भरतखंडाचें अविच्छिन्न, एकमुखी, निरपवाद व एकछत्री राज्यशासनकेन्द्र स्थापन होण्यास लहानसा त्याग करण्याची-सत्तादान करण्याची त्यांना सुबुद्धि सुचेलच. नाहीं सुचली तर काल त्यांना तसें करावयास भाग पाडील. खुषीनें की दबावानें, सन्मानानें की अपरिहार्यपणें केन्द्रशासनांत त्यांनीं विलीन व्हावयाचें, एवढाच प्रश्न आहे. म्हणून संस्थानांतील महाराष्ट्राचें क्षेत्र भावी महाराष्ट्र राजकीय प्रांतांत येण्याच्या कालावधीच्या क्रियेला **उद्याचा महाराष्ट्र** म्हटलें आहे. Union

Government स्थापन होतांनाच विलायत सरकारशीं त्याचा बरोबरीच्या नात्यानें तह व्हावयाचा आहे. या तहाचा अभिप्रेतार्थ असा असेल कीं ( १ ) दोघांच्या देण्याघेण्याचा निकाल लावावा ( २ ) भावी काळांतील व्यापारपेठ ब्रिटिशांना आधीं लाभावी ( ३ ) ब्रिटिशांच्या शत्रूशीं भरतखंडानें सख्य राखूं नये व ( ४ ) इंग्लंडबद्दल कृतज्ञता राखावी व स्नेह तोडूं नये. संस्थानिकांनीं पहिल्या क्षणींच ही भूमिका घेणें हिताचें होईल. ब्रिटिश परके आहेत पण संस्थानिक स्वकीय आहेत; इतकेंच नव्हे तर गतेतिहासांत त्यांनीं स्वदेश व स्वधर्म रक्षणार्थ आपलें तनमनधन खर्चून कर्तव्याचा मोठा वाटा उचलला आहे, कर्तबगारी केली आहे, परचक्राला परतवून लावलें अथवा थोपवून धरलें आहे, अशी बहुमोल राष्ट्रसेवा व धर्मसेवा त्यांनीं केली आहे. आणि म्हणूनच त्यांच्याबद्दल पूज्यभाव आहे, व त्यांचा अधिक्षेप न होतां योग्य इतमाम राखला जाईल. पण त्यांनीं प्रसंगाचें औचित्य राखावयास विसरूं नये. भरतखंडांतील इतर कोणत्याहि संस्थानिकापेक्षां महाराष्ट्रीय संस्थानिक अधिक सूज्ञ, समंजस, उदार व समयज्ञ आहेत. त्यांच्याकडून उद्यांचा महाराष्ट्र बनविण्यास आडकाठी येणार नाहीं असा विश्वास आहे. ब्रिटिशाप्रमाणें त्यांनींहि केन्द्रसत्तेंत विलीन होण्याची इच्छा प्रगट करून तह करावा व आपलें हित साधून महाराष्ट्र एकीकरणांतील आपला हिस्सा उचलावा.

उद्याच्या महाराष्ट्रांतील घडणीपैकीं निजामाचा भाग म्हणजे मराठवाडा महाराष्ट्राला जोडण्यासाठीं देणें हें सहज व सुखासुखी घडेल असें पूर्वेतिहासावरून वाटत नाहीं. पाकिस्थानाचें नंदनवन त्याला दिसत असावें, जिनाचा सल्ला त्याला मूल्यवान वाटेलच व त्यामुळें महाराष्ट्र एकीकरणाच्या वाटेंत केवढा अडथळा येईल याची यावेळीं कल्पना नाहीं. परंतु असें अनुमानतां येतें कीं निजाम ओढून धरील त्याप्रमाणांत कालावधी लागेल खरा, पण तें भारताच्या व पर्यायानें महाराष्ट्राच्या अधिक हिताचें होईल.

संस्थानिकांनीं महाराष्ट्राचे एकीकरणांतील आपला हिस्सा उचलला म्हणजे उद्याच्या महाराष्ट्राची पूर्तता, पूर्तुगीझ सत्तेखालील गोवा व नगर हवेली ( दमण-पैकीं ) हे भाग महाराष्ट्रांत सामील करून घेण्यानें होणार आहे. फ्रेंचांनीं आपल्या प्रजेला स्वयंनिर्णयाचा कौल दिला तसा उद्यां पूर्तुगीझ सत्ता देईल यांत शंका नाहीं. तिच्याकडून फार तक्रार होण्याचा संभव नाहीं.

उद्याच्या महाराष्ट्रापैकीं ज्याची अद्याप महाराष्ट्राला माहिती नाहीं असे ( १ ) नवसारी, सुरत, जव्हार, नाशिक यांच्या मधील संस्थानें वांसदा, धरमपूर,

डांग, (ब्रि.) व डांग (गायकवाडी) सुरगाणा हीं, तसेंच (२) पश्चिम खानदेश जिल्ह्याच्या उत्तरेस त्याला चिकटून असलेलीं बहुसंख्य महाराष्ट्रीयांचा अगदीं लहानसा (सुमारें १० हजार वस्तीचा) इंदूर व बाखाणी संस्थानामधील भाग, असे दोन विभाग आहेत. महाराष्ट्रानें त्यांचें महाराष्ट्रीयत्व तपासून घ्यावें. (३) मंगळोर जिल्ह्यापैकीं २½ लक्ष महाराष्ट्रीय सलग क्षेत्रांत राहतात कीं नाहीं, याची माहिती आणविली पाहिजे व त्या जिल्ह्यांतील महाराष्ट्राचा भाग किती संभवतो हे ठरविलें पाहिजे.

## (४) वऱ्हाडचें भवितव्य

वऱ्हाडचें भवितव्य कसास लागावयाचें असल्यामुळें झगड्याचा विषय आहे. भारताला सत्तादान करण्यासाठीं आलेल्या त्रिमंत्र्यांनीं (१९४६ मे) जें नियमन घालून दिलें, त्या अन्वयें वऱ्हाड निजामाकडे परत आला पाहिजे, असा छत्तारीचे नबाब (निजामाचे दिवाण) व भोपाळचे नबाब (President of the Princes' Chamber) यांचा दावा असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. Government of India Act 1935 अन्वयें आज वऱ्हाडचा कागदी व लौकिकी टिळा निजामाच्या कपाळीं असून, सत्ता Government of India ची असल्यामुळें आज वऱ्हाड मध्यप्रांताचाच एक भाग आहे. Government of India Act च्या ४६ व्या कलमानें ११ प्रांत निश्चित केले, त्यांतच वऱ्हाडच्या अनिश्चित भवितव्याचा उल्लेख आहे. ४७ व्या कलमाच्या पूर्वार्धांत वऱ्हाडची स्थिति समजते ती :–

Whereas certain territory (in this Act referred to as Berar) is under the sovereignty of H. E. H. Nizam of Hyderabad, but is at the date of passing this Act, by virtue of certain agreements[1] subsisting between H. M. and H. E. H., administered with C. P.;

हा करार नंतर झाला आहे, पण त्यापूर्वींच वऱ्हाड मध्यप्रांताला जोडून घेतला होता. निजामाच्या या नव्या पवित्र्याला ब्रिटिश सत्ता कसा कौल देतें हें पाहणें आहे.

---

१ या करारानें निजामाच्या राजपुत्राला Prince of Berar ही पदवी, वऱ्हाडांत निजामाचें निशाण, नागपूरला निजामाचा वकील, विधिमंडळांतील वऱ्हाडच्या प्रतिनिधींना निजामाची शपथ इत्यादि मानपान निजामाला दिले आहेत.

महाराष्ट्राचा राजकीयप्रांत बनण्याआधीं वऱ्हाडचा प्रश्न सुटणें अत्यावश्यक आहे. वऱ्हाडची सत्ता निजामकडे परत जाणार कीं मध्यप्रांतांतील मराठी भागासह महाराष्ट्रांत येणार हा प्रश्न घटनासमितींत ( Constituent Assembly ) निकालांत निघण्यापूर्वी पुष्कळ घासाघीस करावी लागेल. भरतखंडाची शासन-विधानें निश्चित होऊन पार्लमेंटनें त्याला मान्यता दिल्यावर स्वतंत्र भारताची ( Union Government ) ची राजसत्ता चालू झाली म्हणजे बादशहाचा निजामाशीं असलेला सार्वभौमत्वाचा संबंध संपणार, व त्यानंतर निजामाकडे वऱ्हाडची मालकी परत जाते कीं नाहीं हें कूट निर्णयासाठीं येणार. पण त्यापूर्वी घटनासामिति हल्लींच्या व्यवस्थेप्रमाणें मराठी मध्यप्रांताबरोबर वऱ्हाड महाराष्ट्रांत घालूं शकेल व निजाम तिला पुढील अडचण दाखवून विरोध करूं शकेल. म्हणजे वऱ्हाडचा प्रश्न मोठ्या निकराचा होणार. १९३५ Government of India Act होण्याच्या वेळचा दाखला असा आहे कीं त्यावेळीं वऱ्हाडचें स्थान ठरविणारा जो करार ब्रिटिश सरकार व निजाम यांच्यामध्यें पुढें झाला; तो होण्या-पूर्वींच वऱ्हाड मध्यप्रांताला जोडून घेतला होता व त्यासंबंधाचे Government of India Act. मधील ४७ व्या कलमांतील शब्द And whereas it is in contemplation that an agreement shall be concluded between H. M. and H. E. H. whereby notwithstanding the continuance of the sovereignty of H. E. H. over Berar, the C. P. and Berar may be governed together as one Governor's province under this Act by the name C. P. and Berar असे आहेत. असेच शब्द नव्या घटनेंतील कलमांत घालतां येतील. फक्त H. M. च्या ठिकाणीं Union Government व C. P. & Berar ठिकाणीं "महाराष्ट्र" हे शब्द बदलावे लागतील आणि Union Government व निजाम यांच्यामध्यें नवा करार करावा लागेल व त्यांत या नव्या स्वरूपाला दोघांची मान्यता नमूद असावी लागेल. आणि निजाम याला कबूल झाला नाहींतर......पण तें पुढचें अशुभ यावेळींच कां उच्चारावें ?........

पण ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं वऱ्हाड सामील असल्यावांचून मुंबई व मध्यप्रांतांतील महाराष्ट्राच्या विभागांना एकत्र जोडतां येत नाहीं म्हणजे संयुक्त महाराष्ट्र निर्माण होत नाहीं. महाराष्ट्राच्या पूर्णतेसाठीं वऱ्हाड मिळविलाच पाहिजे. तो महाराष्ट्राचा एक विभाग, नव्हे मूळ महाराष्ट्र असल्यामुळें त्याचें महत्त्व व समावेश अनिवार्य आहे !

## महाराष्ट्रियांना विनंति

भरतखंडाच्या नव्या राजकीय घडामोडींत मुंबई इलाखा व मध्यप्रांत विभागले जाणार आहेत. त्यांतील महाराष्ट्राचा भाग आणि वऱ्हाड, निजामराज्य, गोवा व चारी दिशांच्या सरहद्दीवरील लहान मोठे भूभाग जेवढे महाराष्ट्रीय ठरणें अवश्य आहे त्यांचें माझ्या जवळील माहितीच्या आधारें पुढील पानावर महाराष्ट्रपण नमूद केलें आहे. अधिक तपशील विस्तार भयानें दिला नाहीं. या सर्व भागांतील बांधवांचें महाराष्ट्रियत्व ऐतिहासिक, वांशिक, भाषिक, सांस्कृतिक आधारानें मांडलें आहे. महाराष्ट्र समाज, महाराष्ट्र भाषा, महाराष्ट्र संस्कृति व महाराष्ट्र देश यांचा पूर्वापर इतिहास साधार सांगितला आहे; हेतू हा कीं अनुमानधपका अथवा पोकळ भावना या ढिसूळ पायावर माझीं विधानें राहूं नयेत. गैरसमजानें, अजाणतपणें अथवा दुरभिमानानें ज्यांना महाराष्ट्रियेतर म्हटलें, ज्या बोली महाराष्ट्रीय नव्हत असें समजत आलों, जें क्षेत्र महाराष्ट्राचें नव्हे असेंच आम्हीं व सरकारदरबारीं व राजकीय पक्षांच्या भूभागविभागणींत धरलें आहे, त्यामुळें महाराष्ट्राचें क्षेत्र व महाराष्ट्रियांची संख्या अनिर्णित राहिली आहे. हे गैरसमज, अजाणतेपण, दुरभिमान व सरकारी माहिती चुकीची आहे हें प्राचीन इतिहासाची व आधुनिक वस्तुस्थितीची जी माहिती पुढें दिली आहे त्या आधारानें सर्वांना पटेल व भावी महाराष्ट्राचे जितके म्हणून क्षेत्र व समाज पुढें दिले आहेत ते महाराष्ट्रांत समाविष्ट धरले जातील, याबद्दल महाराष्ट्रानें म्हणजे संयुक्त महाराष्ट्र परिषद् व राजकारणांत वावरणाऱ्या महाराष्ट्रियांनीं दक्षतेनें झगडलें पाहिजे. सरहद्द भाग म्हणून जेवढे विभाग दिले आहेत, तेथील स्थानिक जनतेचा पूर्ण पाठिंबा, सहकार्य, उठाव आणि पाठपुरावा यापुढें ज्या ज्या चळवळी संयुक्त महाराष्ट्राचा राजकीय प्रांत निर्माण करण्यासाठीं कराव्या लागतील त्यास दिला पाहिजे. शाब्दिक अथवा कागदी बाण हवेंत विरून जातील. सरहद्द कमिशन बसेल तेव्हां सरहद्द भागांतील जनतेला ज्ञान देऊन सार्वत्रिक मत नोंदणीसाठीं (referendum) तयार केलें पाहिजे, सरकार दरबारीं कागदोपत्री पुरावा दिला पाहिजे, आणि सर्वसामान्य जनतेचें मत व शक्ति सिद्ध ठेवली पाहिजे.

**यावेळीं महाराष्ट्राचें म्हणून जेवढें क्षेत्र ठरेल तें दिगंत राहील. त्यांत जी चुकी होईल ती अक्षय्य राहील. वेळीं दक्षता न घेतल्यामुळें होईल त्या नुकसानीची भरपाई नंतरच्या पश्चात्तापानें भरून येणार नाहीं. पूर्ण सावधानता, शक्तिसर्वस्व व बुद्धिसामर्थ्य याच वेळीं पणास लाविलें पाहिजे.**

## अगदीं अखेरचे आकडे

आज १९४६ मध्यें आपण भाषाप्रमुखप्रांतरचना करण्यास सिद्ध झालों आहोत. याचें मुख्य साधन जे भाषक संख्यांचे आंकडे ते १९४१ च्या अखेरच्या शिरगणतींत, मोजले गेले नाहींत, म्हणून पुढें पानें ३२ ते ४० मध्यें १९३१ चे व कांहीं तर १९०१ चे द्यावे लागले आहेत, १९४१ मधील फक्त लोकसंख्येचे आकडे मिळतात ते खालीं देतों, त्यावरून महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या तेव्हां किती होती हें कळेल.

| विभाग | लोकसंख्या |
|---|---|
| (१) आजचा बहुसंख्य महाराष्ट्र :— | |
| (अ) मुंबई प्रांत १२ विभाग | ११९१३५४४ |
| (आ) मध्यप्रांत ४ जिल्हे | ३४१५८२८ |
| (इ) वऱ्हाड चार जिल्हे | ३६०४८६६ |
| (ए) बेळगांव जिल्ह्यांतील ३ तालुके | २६९६२० |
| (ऐ) कारवार जिल्ह्यांतील ३ तालुके | १११३९२ |
| (अः) मध्यप्रांतांतील चार तालुके | ५७१३०० |
| एकूण | १९८८६५५० |

| विभाग | लोकसंख्या |
|---|---|
| (२) उद्याचा बहुसंख्य महाराष्ट्र :— | |
| (ई) मुंबई प्रांतांतील १८ संस्थानें | २७३०४५४ |
| (उ) निजामराज्यांतील ६ जिल्हे (अंदाजी आकडे) | ५०००००० |
| (ऊ) पूर्तूगीझ–गोवाप्रांत व नगर हवेली (अंदाजी आकडे) | ६००००० |
| एकूण | ८३३०४५४ |

**महाराष्ट्राची १९४१ मधील लोकसंख्या २८२१७००४**

याशिवाय सरहद्दीवरील ७ विभागांमधील सुमारें १४ लक्ष स्वकीयांचे आकडे घालावे लागतील व त्या भागातील जनसंख्या सुमारें १७ लक्ष भरेल; व महाराष्ट्राची लोकसंख्या तीन कोटी झालेली आढळेल.

महाराष्ट्राच्या १९३१ च्या लोकसंख्ये (पान ३८ पहा) पेक्षां १९४१ मध्यें १८९७३०६ ची वाढ आहे. १९३१ मधील महाराष्ट्रीय भाषाभाषक संख्या २०२१९७२९ होती. १९४१ मध्यें ही दिली नाहीं म्हणून लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणांत ती अंदाजी २१६३९००० असावी.

टीप. १. पान ३८ वरील २०१९५५५९ हा आंकडा चूक असून वर दिलेला २०२१५७२९ हा आकडा बरोबर समजावा.

संतांचीं उच्छिष्टें बोलिलों उत्तरें ॥

# महाराष्ट्र राजकीय प्रांत.

## ( Governor's Province )

भरतखंड इंग्रजांच्या हातीं आल्यानंतर राज्यव्यवस्थेच्या सोईसाठीं त्याचे निरनिराळे विभाग पाडून त्यांना 'इलाखा' अगर 'प्रांत' अशीं नांवें दिलीं. हे विभाग पाडतांना कांहीं विशिष्ट धोरणानें तशी विभागणी केली नसून जसजसे भूभाग जिंकले गेले तसतशी ती विभागणी त्यावेळीं झाली होती. आतां राज्यव्यवस्था सुस्थित झाली आहे व त्या विभागांतील जनतेच्या अडचणी, आकांक्षा, हितसंबंध, सुखसोई, गरजा भागवितांना, एक भाषा, समान संस्कृति यांची विसंगति जाणवूं लागली आहे व त्यामुळें प्रांतपुनर्रचनेचा प्रश्न गेलीं २५–२६ वर्षें जनतेकडून जिव्हाळ्यानें हाताळला जात आहे व राजकीय चळवळीची धुरा वाहणाऱ्या राष्ट्रसभेच्या द्वारें या प्रश्नाला तोंड फोडून भाषावार प्रांतनिर्मिति नव्यानें केली जावी असें घोषित केलें गेलें आहे. सरकारलासुद्धां ही विसंगति पटली आहे. ही विसंगति दक्षिण भारतांतच झालेली असल्यानें त्यांतील आंध्र, कर्नाटक, तामीळ, कोसल या घटकांनीं तीव्रतेनें या प्रश्नाचा पाठपुरावा केला आहे. महाराष्ट्र या बाबतींत मागसलेला होता तोहि आतां जागा झाला असून हातपाय हालवूं लागला आहे. बेळगांव साहित्यसंमेलनाच्या द्वारा महाराष्ट्र-एकीकरणाचा प्रस्ताव श्री. माडखोलकर यांच्या पुरस्कारामुळें धसाला लागून त्याचा पाठपुरावा करण्यासाठीं एक समिति नेमिली गेली आहे. साहित्य संमेलनानें भाषेच्या निमित्तानें कां होईना आपल्या क्षेत्राच्या बाहेर पडून राजकारणप्रमुख प्रश्नाला चालना दिली हें सुचिन्ह मानलें पाहिजे. आतां राजकारणी पुरुषांनीं पुढें येऊन हा महाराष्ट्र-राजकीय-प्रांतघडणीचा प्रश्न सोडविण्यास सहाय्य करणें, नव्हे पुढाकार घेणें युक्त आहे. श्री. माडखोलकरांच्या या समयज्ञतेबद्दल महाराष्ट्र त्यांचा ऋणी राहील.

भरतखड बव्हंशीं मानववंशदृष्ट्या व धर्मसंस्कारदृष्ट्या मूळचा एकजिनसी असला तरी अनेक कारणांमुळें पण विशेषतः प्रमाणबाह्य विस्तारामुळें आणि प्राचीन काळच्या दळणवळण-साधन-दुर्लभतेमुळें वसाहतभेदाप्रमाणें आचार-विचार, वस्त्रपेहराव, पाकसिद्धि, व्यक्तिनामप्रकार, भाषा, सामाजिक रूढी एकमेकांहून

निरनिराळ्या बदलल्या गेल्या आहेत. एका भाषेचे पोटभेद सुद्धां विसदृश वाटतील असे आहेत. एका संस्कृतीच्या जनसमूहांत दोन भाषा बोलणारांचे गट आहेत, तर एक भाषा संपली कोठें व दुसरीचा आरंभ होतो कोठें हें सुद्धा कांहीं ठिकाणीं चटकन् उमगून येत नाहीं, इतके ते एकमेकांत मिसळून गेले आहेत. भारतीय भाषांचे वैदिक आर्यांच्या भाषा व द्रविडी भाषा असे दोन प्रमुख भेद आहेत. आणि द्रविडी भाषा बोलणारे आजचे लोक हे तेथल्या वैदिक वसाहत-वाल्यांचे मिश्र वंशज आहेत, शुद्ध द्राविडवंशीय नव्हेत, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे भरतखंड मानववंशदृष्ट्या बव्हंशी आर्य व द्रविड या दोन्ही भाषा बोलणाऱ्या वैदिकांचा एकजिनसी समाज आहे हें आरंभीचें विधान पटेल.

भरतखंड मूळचा एकमेव वैदिकधर्मी होता व आतां त्यांत जैन, बुद्ध, मुसलमान, ख्रिस्ती असे नवे धर्म स्वीकारले गेल्यामुळें अनेक धर्मभेद निर्माण झाले असले तरी ते मूळचे एकवंशी व एक संस्काराचेच लोक असल्यानें धर्मभेद जनतेंत विलगता आणीत नाहींत. शीख, लिंगायत, महानुभाव, निरीश्वरी, एकेश्वरी, प्रार्थना, ब्रह्मो, थिऑसफी या पंथांनीं तर सामाजिक दृष्ट्यासुद्धां भेद पाडला नाहीं. फक्त पार्शी समाज मात्र निराळा अलिकडे बाहेरून आलेल्या अवैदिकांचा आहे. आदिवासी जनसमूह मूळचाच अवैदिक व भिन्नवंशीय असेल पण आतां तो वैदिकांशीं जवळ जवळ येत चालला आहे. अशा स्थितींत धर्मभेद व वंशभेद हें प्रांत-पुनर्रचनेचें अधिष्ठान होऊं शकत नाहींत.

भूविभागांच्या नैसर्गिक एकजिनसीपणामुळें संस्कृति, आचारविचार, रूढी यांची एकरूपता असलेले जनसमूह एकजिनसी एकावयवी असतात. कोठें कोठें त्यांच्यांत भाषाभेद निर्माण झाले, ते रहिवासस्थळांतील हवा, पाणी, भूप्रकार, मूळ रहिवाशांशीं संबंध व प्रतिकार अथवा सहभाव, त्या जमिनींतील सकसनिकसपणा, इतक्या गोष्टींचा परिणाम होऊन, झाले आहेत.

राज्यव्यवस्थेसाठीं आतां नव्यानें भरतखंडाची विभागणी करतांना (१) भारतीय जनता मूळची एकमानववंशीय व एकधर्मसंस्कारित आहे; (२) पुढील काळांत झालेल्या धर्मभेदांनीं त्यांच्या एकजिनसीपणांत फार मोठे भेद निर्माण झाले नाहींत; (३) सहवासनिर्मित व भूभेदनिर्मित भाषाभेद व तज्जन्य संस्कार-भेदहि निर्माण झाले आहेत; (४) कोठें कोठें प्राप्त परिस्थितीमुळें एका संस्कृतीचा जनसमूह दोन भाषाभाषी झाला आहे; इतक्या गोष्टी लक्षांत घेऊन (५) एकेक भूभाग असा विस्तृत व स्वयंसिद्ध बनवावा कीं त्याचें धारण, पोषण, संरक्षण

यासाठीं त्याला शेजाऱ्याकडे अथवा मध्यवर्ती सत्तेकडे तोंड वेंगाडावें लागूं नये; आणि (६) असें करतांना त्या भागांत एका संस्काराचा जनसमूह असला पाहिजे मग त्यांत भाषाभेद असले तरी चालतील पण त्यामुळें त्या एका संस्कृतीच्या गटाचे दोन तुकडे पाडले न जावे; (७) एकेक प्रांत आर्थिक दृष्टया स्वयंपूर्ण राहून केन्द्रस्थानाला अधिक बलशाली करणारा असला पाहिजे. इतक्या कसोट्यांना उतरणारे नवीन प्रांत बनले पाहिजेत. आपल्या महाराष्ट्राचा भावी प्रांतहि या सर्व गुणांनीं युक्त असा बनला पाहिजे.

महाराष्ट्राचें भूक्षेत्र निश्चितपणें प्रथमच ठरलें जावयाचें असल्यानें, तें ठरविलें जाण्याचीं गमकें जितकीं स्पष्ट व ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या आधाराचीं व वस्तुस्थितिनिदर्शक असतील तितकी तीं निस्संदेहपणाला पोषक ठरतील म्हणून तीं सांगणें अवश्यक आहे. अशा प्रकारें एकाद्या भूक्षेत्राला विशिष्टत्व व विशेषनाम प्राप्त होण्याला जी घडण घडावी लागते तिचा उगम असा असतो:—

मानवाची प्राथमिक अवस्थेंत भ्रमण करण्याची इच्छा पुरी झाल्यावर स्थायी होऊन राहण्याचें जेव्हां तो ठरवितो तेव्हां त्याला व्यक्तिमात्रांतील बंधुभाव, सहवासप्रियता, परस्परसहकारिता, सामुदायिक संरक्षणक्षमतेची आवश्यकता, या सर्वांच्या गरजेंतून मनुष्यांचा एक सामाजिक गट निर्माण होतो. अशा गटाच्या चालीरीति, सामाजिक रूढी, धर्मकल्पना व भावना, वस्त्रपेहराव, अन्नपद्धति, व्यक्ति व कुटुंबनांवें, देवता, एकप्रकारच्या बनत जातात; या सर्वांच्या सामुच्चयिक घडणीला त्या समाजाची संस्कृति म्हणतात; या सर्व समाजाची बोधभाषाहि एकच निर्माण होते आणि एक संस्कृति व एक भाषा यांच्यामुळें तो समाज एकजीव, संघटित, एकरूप, अविच्छिन्न बनतो व त्या समाजाला एक नांव निर्माण होतें, त्या समाजाच्या संस्कृतीला व भाषेला त्या समाजाच्या नांवाचें विशेषणात्मक रूप नांव म्हणून मिळतें. असा हा एक संस्कृतीचा व एक भाषेचा समाज ज्या भूमींत राहतो त्या भूमीला नंतर तसेंच विशेषणात्मक नांव प्राप्त होतें.

आनुवंशिकपणामुळें महाराष्ट्रीय हे वैदिक आर्यांचे वंशज होत. वैदिक आर्यांपैकीं ज्यांनीं अवन्ती देशांत स्थायी वस्ती केली त्यांना महाराष्ट्रीय हें सामाजिक नांव मिळालें तसेंच त्यांच्या संस्कृतीला महाराष्ट्रसंस्कृति, त्यांच्या भाषेला महाराष्ट्री भाषा, व ते वस्ती करून राहिले त्या भूमीला महाराष्ट्र देश अशीं नांवें वरील नियमानुसार प्राप्त झालीं आहेत.

अवन्ती देशांत जन्म[1] पावलेली महाराष्ट्रसंस्कृति व महाराष्ट्रभाषा पुढें ज्यांनीं ज्यांनीं स्वीकारली त्यांना त्यांना महाराष्ट्रीय[2] हेंच सामाजिक नांव लागत गेलें व असा महाराष्ट्रीय समाज ज्या ज्या भूभागांत रहात होता अथवा रहावयास गेला त्यांचीं मूळचीं नांवें आणखी कांहीं असलीं तरी त्या सर्वांचें सामुदायिक भूनाम महाराष्ट्र हेंच यापुढें चालू झालें. महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास असा घडत गेला आहे असें दिसतें.

अवन्ती देशांत महाराष्ट्रसमाज जन्मला तो काळ शकपूर्व ६।७ हजार[3] वर्षांचा असावा असें अनुमानतां येतें; आणि माहिषकापर्यंत व अपरान्ताच्या दक्षिण भागापर्यंत त्यांना पोचण्यास २।३ हजार वर्षें लागलीं असावींत.

महाराष्ट्र या प्रादेशिक नांवाचा उल्लेख शकपूर्व तिसऱ्या[4] शतकांत, महाराष्ट्री भाषेचा उल्लेख शकपूर्व ५ व्या[5] शतकांत व महाराष्ट्र समाजाचा उल्लेख शकोत्तर ३ ऱ्या[6] शतकांत प्रथम सांपडतो. त्यापूर्वी त्याच्या विभागांचे निर्देश शकपूर्व ३००० वर्षांपासून होत आले आहेत.

महाराष्ट्राच्या घडणीचा हा एक विशेष आहे कीं तो महाराष्ट्र या नांवानेंच प्रथम जन्माला आला नाहीं. त्याच्या पोटविभागांचीं कांहीं वैशिष्ट्यें होतीं; त्यामुळें त्यांना "राष्ट्र" नांवानें प्रथम संबोधूं लागले होते असें दिसतें. अशा सर्व एकीकृत राष्ट्रांच्या संघाला "महाराष्ट्र" ही पदवी पुढील काळांत प्राप्त झाली आहे. या एकीकरणाचा आत्मा महाराष्ट्रसंकृति व महाराष्ट्री भाषा हीच होत. महाराष्ट्र संस्कृतीचा महाराष्ट्रीभाषाभाषी महाराष्ट्रसमाज ज्या ज्या सलग प्रदेशांत राहतो ते सर्व भाग मिळून महाराष्ट्र देश होय.

---

१ पान ४६८ विक्रमस्मृति मराठी ग्रंथ. २ हा निसर्गक्रम आहे. Pp. 15–16 Historical Linguistics by Dr. S. M. Katre. ३ पान ४६८ ते ४७० विक्रमस्मृति मराठी ग्रंथ. ४ Tarner's महावसो पान ७१ ते ७४. ५ वररुचीच्या व्याकरणांत "महाराष्ट्रीभाषा" आहे व वररुचीचा काळ शकपूर्व ५ वें शतक. ६ (१) बृहत् संहिता; १०:८. P. 66 of the Commentary by Kern (1865 Ed.) (२) वात्स्यायन कामसूत्रें २:४:११ व २:५:२९. ७ शतपथ ब्राह्मणाचा काळ P. 245 Ind. Ant. Vol. XXIV व ज्ञानकोश भाग २ पान ४०९ (परिशिष्ट A पान १–२). या ब्राह्मणांत वैदर्भी कौडण्य याचा उल्लेख (१४:५:५:२२) आहे. ८ P. 143: Bom. Gaz. Vol. I Part II.

भावी महाराष्ट्र देशाच्या बनावटीचा, महाराष्ट्र संस्कृति, महाराष्ट्री भाषा, महाराष्ट्रीय समाज हाच पाया असल्यामुळें इतिहासपूर्वकालीन, इतिहासकालीन व आधुनिक काळची महाराष्ट्रीयत्वाचीं हीं गमकें एकच असणार.

## महाराष्ट्र संस्कृति

महाराष्ट्र संस्कृति म्हणजे अमूक असें कोठेंच नमूद नाहीं. १० व्या शतकापर्यंत महाराष्ट्राचा म्हणून स्वतंत्र इतिहास नमूद नाहीं. त्याच्या विभागांचें मोठेंपण गायिलेलें आढळतें. अवन्ती म्हणजे इतिहासकालीन मालवदेश. या भागांतील मालवगण[1] ही लोकसत्ताक ग्रामसंस्था महाराष्ट्राचें वैशिष्ट्य आहे. विदर्भाच्या पंचकन्या[2], वैदर्भीरीति ही प्राचीन आणि महानुभावपंथ व मुकुंदराज हा कविशिरोमणी, ज्यांनीं महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासाचा पाया घातला, हीं विदर्भाचीं वैभवें होत. पेतनिक, नाशिक्य व करहाटक हीं महाराष्ट्राचीं विद्यापीठें होतीं, हीं सर्व महाराष्ट्रसंस्कृतीच्या श्रेष्ठतेचीं फळें होत. तरीसुद्धा खुद्द संस्कृतीचें स्वरूप यामुळें पूर्णपणें दिसलें असें होत नाहीं. ६ व्या शतकापासून प्रादेशिक विभागांचें महत्त्व कमी होत जाऊन एकजिनसी महाराष्ट्र नांवानें सामुदायिकपणें ओळखला जाऊं लागला. त्यानंतरचीं १२ व्या शतकांतील ३।४ उदाहरणें देतों:—"महाराष्ट्री असांवे[3]" या चक्रधरोक्त सूत्राच्या विवरणांत महाराष्ट्र-संस्कृतीचा स्पष्ट उलगडा केला आहे. तसेंच १४ व्या शतकांत महाराष्ट्र धर्माचें वर्णन महिकावतीच्या बखरींत[4] केलेलें आहे. त्यांतहि महाराष्ट्रियत्वाचें स्पष्ट चित्र रेखाटलेलें सांपडतें. श्री समर्थ रामदासस्वामी सर्व भरतखंड फिरून आल्यानंतर त्यांनीं महाराष्ट्र धर्माची पुन्हा आठवण करून दिली. इतर कोणत्याहि प्रांताला ही शिकवण दिली नाहीं. उलट आपलेच मठ व त्यांत महाराष्ट्रीय महंत इतर प्रांतांत स्थापिले. शिवाजीनें हिंदवी राज्यस्थापनेचा चंग बांधला, रजपूत राजांना उपदेश केला, राज्यव्यवहारकोश केला, बाटलेल्यांना पुन्हा स्वकीयांत घेतलें, या सर्वांच्या बुडाशीं महाराष्ट्र संस्कृतीचें वैशिष्ट्य होतें. महाराष्ट्रियांचे कांहीं दोषहि आहेत; तोहि महाराष्ट्रीय संस्कृतीचें वैशिष्ट्यच होय.

---

१ सह्याद्रि मासिक इ. स. १९४३ आक्टोबर पान ६९३ ते ७०१ व डिसेंबर पान ७८९ ते ७९२ ( महाभारत; शांतिपर्व )

२ इंदुमती, केशिनी, लोपामुद्रा, रुक्मिणी, दमयन्ती.

३ आचारस्थळ–त्यागप्रकरण ( नेने ) पान ५४, ५७ व ५८.

४ पान ५२ ते ५४

प्रमाणबद्ध काटक शरीर, बुद्धीची तडफ व तीव्रता, स्वाभिमान, सडेतोडपणा, शौर्य, पराक्रम, औदार्य, साधी राहणी, हे विशेष गुण व व्यापारी बुद्धीचा अभाव, स्वाभिमानापायीं सर्वस्वत्यागाची तयारी, हिशेबीपणाची उणीव इत्यादि दोष, हीं महाराष्ट्रीयांचीं वैशिष्ट्यें आहेत. महाराष्ट्र संस्कृतीचें वर्णन इतकें त्रोटक करतां येतें. अन्यप्रांतियांशीं तुलनेनेंच ती अधिक पटणार आहे.

आजच्या महाराष्ट्राबाहेर महाराष्ट्र संस्कृतीचे अवशेष सांपडतात ते:—(१) नर्मदेच्या उत्तरेकडील हिंदी भाषेंतील म्हणी महाराष्ट्र भाषेंतील म्हणींशीं एकरूप[१] आहेत. (२) गुजराथेंतील जंबू, मोताळा, कपिल, भार्गव या जातींनीं अनेक रीतीनें महाराष्ट्रीय संस्कृति[२] जतन केली आहे. महाष्ट्रसंस्कृतीची छाप गुजराथी संस्कृतीवर पूर्ण पडलेली आढळते. लेवा गुंजर व लेवा कुणबी वारकरी पंथाचे कट्टर अनुयायी झाले आहेत. (३) तेलगु ( आंध्र ) समाज, कानडी आणि तामीळ समाजापेक्षां महाराष्ट्रीयांना जवळचे मानतो. " राव " हें उपपद तेलगु समाजांत रूढ आहे. तेलगु समाज नागपूर-वर्धा भागांत एकदा आला कीं तो एका पिढींत महाराष्ट्रीय बनतो[३]. अशीं हजारों कुटुंबें महाराष्ट्रीय झालेलीं आहेत. तेलंगी ब्राह्मण, पद्मसाळी व इतर जातीचे तेलंगी हजारांनीं महाराष्ट्रीय बनलेले कोंकणांपर्यंत आढळतात. (४) कानडी बोलणारा बेळगांव, धारवाड, विजापूर जिल्ह्यांतील सर्व समाज, भाषा सोडली तर पूर्णतया सांस्कृतिक महाराष्ट्रीय आहे, कन्नडिग नव्हे. (५) मल्याळ देशांत सारस्वतादि ब्राह्मण महाराष्ट्रीय आहेतच पण कुडुबी नांवाचा बहुसंख्य समाज महाराष्ट्रीय कुणब्यांचा दिसतो. (६) सुरत-भडोच आणि नाशिक-खानदेश जिल्ह्यामधील जव्हार ते नवसरी—डांग टापूंतील कुकणा समाज मानववंशशास्त्री व भाषाशास्त्री सरकारी युरोपियनांनीं चुकीनें भिल्ल ठरविला असला तरी तो सह्याद्रींतील मावळ्यांचा भोसले, गायकवाड, यादव, जाधव, आडनांवांचा महाराष्ट्रीय मावळा[३] आहे. ( ७ ) मराठी मध्यप्रांत-वऱ्हाडच्या उत्तरेकडील व पूर्वेकडील हिंदीवर शौरसेनीपेक्षां महाराष्ट्रीची छाप आहे असें भाषाशास्त्रज्ञ डॉ. सर ग्रीअरसन[४] सांगतो. याप्रमाणें महाराष्ट्रसंस्कृति प्रसरणशील, आक्रमक व श्रेष्ठ श्रेणींतील आहे.

१ पुरुषार्थ मासिक १९४१ सप्टेंबर चा अंक पान ७६ ते ८१

२ केसरी ( ८-९-१९४२ ) वर्तमान पत्रांतील " गुजराथी महाराष्ट्रीय व महाराष्ट्रीय गुजराथी " हा लेख

३ लेखकानें समक्ष जाऊन प्रत्यक्ष चक्षुर्वै सत्यं मिळविलेली माहिती.

४ P. 7, Vol. VII, Grierson's Linguistic Survey of India.

## महाराष्ट्र-भाषा

महाराष्ट्राची भाषा महाराष्ट्री. हिचें जन्मस्थळ जरी अवन्ती देश हा महाराष्ट्राचा विभाग असला तरी १० व्या शतकापर्यंत तिची क्षेत्रव्याप्ति म्हैसूर संस्थानअखेर कावेरीपर्यंत[1] होती. पण तिचें पराक्रमक्षेत्र अखिल भरतखंड होतें. ती सर्व प्राकृत[2] व अपभ्रंश भाषांत श्रेष्ठ होती. महानुभावपंथाची भाषा म्हणून आजहि पंजाब, सरहद्द व अफगाणिस्थानांत सुद्धां चालू आहे. १६ ते १८ व्या शतकांत ती मद्रास इलाख्यांत[3] सुस्थित झाली. इ. स. १८६० नंतर ब्रिटिशसत्ताधिकाऱ्यांनीं तिला गचौण्डी[4] दिल्यानंतर ती मद्रास इलाख्यांतून हतप्रभ झाली. उत्तरभारतांत १७५० पासून १८१० पर्यंत ती राज्यव्यवहाराचें व अर्थव्यवहाराचें वाहन[5] होती. आज तिचें सार्वभारतीय स्थान गेलें असलें तरी श्रेष्ठ प्रतीचें वाङ्मय व नव्या नव्या घडणीचें साहित्य प्रसवणारी म्हणून तिचा लौकिक सर्व दूर पसरलेला आहे.

आजचा प्रांत बनविण्याचें साधन म्हणून क्षेत्रनिश्चितीसाठीं महाराष्ट्रभाषेचा उपयोग होणार आहे तो तिच्या प्रादेशिक बोलींची क्षेत्रव्याप्ति समजते त्या आधारामुळेंच. महाराष्ट्र भाषेच्या प्रादेशिक बोली व त्यांची क्षेत्रव्याप्तिः—

१ हळबी—झाडीमंडळ म्हणजे भंडाऱ्यापूर्वेकडील जंगल प्रदेश. विशेषतः बस्तर व कांकेर संस्थानांतील अनेक वन्यजातींचा प्रदेश.

२ नागपूरी—मध्यप्रांतांतील ४ महाराष्ट्रभाषाभाषी जिल्हे व उत्तरेकडील त्यालगतच्या जिल्ह्यांतील सलग असलेले तालुके व गांवें.

३ वऱ्हाडी—वऱ्हाडचे चार जिल्हे.

४ खानदेशी—खानदेशचे दोन जिल्हे व बऱ्हाणपूर तालुकाआणि बढवाणी संस्थानांतील खेटिया तहशील.

---

१ श्रवणबेळगोळचा मराठी लेख. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै १९४२ पान २६७–७४.

२ P. 29, Prakrit Languages by Dr. S. M. Katre.

३ P. 133, Minutes of Sir T. Munro by Arbutnot.

४ P. 45, Bom. Gaz. Vol. XXII, Dharwar (1884 Ed.) by Campbell.

५ राजपुताना व माळवा यांतील संस्थानांचें राजकारण महादजीच्या हातीं व अर्थकारण किंवे यांच्या सावकारी पेढीच्या हातीं होतें त्यामुळें पत्रव्यवहार व हिशेब सर्व राजे राजवाड्यांचे महाराष्ट्रभाषेंत चालत.

५ उत्तर कोंकणी—सुरत व नाशिक जिल्ह्यामधील "डांग" प्रदेश—जव्हारपासून बडोदें संस्थानपैकीं नवसरीचा दक्षिण भाग.

६ मध्यकोंकणी—ठाणें, कुलाबा व रत्नागिरी जिल्हा व संस्थानें.

७ दक्षिणकोंकणी—सावंतवाडी, गोवा, कारवार, मंगळूर जिल्हे व पुढें त्रिवेंद्रम्‌पर्यंत.

८ केन्द्र महाराष्ट्रभाषा—नाशिक ते बेळगांव व सोलापूर पर्यंतचे जिल्हे व संस्थानें आणि निजामाचा मऱ्हाठवाडा—औरंगाबाद ते आदिलाबाद व बेदर या त्रिकोणांतील प्रदेश.

भाषादृष्ट्या इतकें क्षेत्र भावी महाराष्ट्र प्रांताचें असणार आहे.

महाराष्ट्रभाषेच्या काल व स्थल निर्देशावरून महाराष्ट्रदेश व महाराष्ट्र-समाजाचा प्राचीनपणा व विस्तार कळतो म्हणून तो येथें देतों.

महाराष्ट्राची भाषा महाराष्ट्री हिचा प्रथम उल्लेख वररुचीच्या व्याकरणांत[2] शकपूर्व ५ व्या शतकांत[3] सांपडतो. शककालारंभीं हालराजानें महाराष्ट्री भाषेंतील ७०० काव्यांचें नवनीत तयार करून दिलें, त्यारूपानें तिचें वाङ्मयीन स्वरूप आज उपलब्ध आहे.

सहाव्या शतकांत महाराष्ट्राचें क्षेत्र म्हणून जितका प्रदेश सांगितला त्या सर्व क्षेत्रांत महाराष्ट्री प्राकृत ही स्थानिक भाषा चालू होती.

---


१ ही माहिती लेखकानें स्वतः संपादली असून शिरगणति अहवालाच्या आधारें हें विधान केलें आहे. तपशील महाराष्ट्र विद्यापीठ समितीस सादर केलेल्या प्रश्नोत्तरांत आहे.

२ प्राकृत प्रकाशांतील "प्राकृत" ही महाराष्ट्री होय.

३ (a) P. VI : Preface by Cowell to प्राकृत प्रकाश edited by Dr. P. L. Vaidya.
(b) P. VI & IX, Introduction to his Sanskrit Dictionary by Wilson.
(c) P. 55, History of the Deccan (Commemoration Vol. III) by Dr. R. G. Bhandarkar.
(d) पानें २५८–२६५ व ३११ ते ३२५, प्राचीन महाराष्ट्र (डॉ. केतकर संपादित), भाग १ ला.


४ Ihole Inscription : B. O. R. I. Annals Vol. XXVI. Pp. 503–4.

भूक्षेत्राच्या नैसर्गिक विभागणीमुळें व त्या विभागांतील जनतेच्या सांस्कृतिक उच्चनीचतेमुळें भाषेंत जे फरक पडतात त्यांना "प्रादेशिक बोली" अशी संज्ञा आहे. महाराष्ट्रभाषेच्या प्रचलित अवस्थेंतहि याप्रमाणें बोली आहेत. त्या बोली व त्यांनीं व्याप्त प्रदेश खालील भूचित्रांत दाखविले आहेत.




महाराष्ट्र भाषेच्या बोली व त्यानी व्यापलेले क्षेत्र

महाराष्ट्राचा क्षेत्रविस्तार केवढा होता याचा अंदाज ऐहोळे शिलालेखावरून ( शके ५५६ ) केला आहे. ( पान २३ वरील भूचित्र पहा. ) पुलकेशी २ रा याच्या आधिपत्याखालील ह्या महाराष्ट्रांत महाराष्ट्राचीच भाषा चालत होती, हे स्पष्ट करणाऱ्या निरनिराळ्या काळांतील निरनिराळ्या भागांत सापडणाऱ्या तिच्या निशाण्या खालील भूचित्रांत दाखविल्या आहेत.



## महाराष्ट्रभाषा–व्याप्त प्रदेश

( १ ) आजचा माळवा म्हणजे पूर्वींचा अवन्तीदेश; याची भाषा आवन्ती. या आवन्तीची व्याख्या "आवन्तीस्यान् महाराष्ट्री शौरसेन्यस्तु संकरात्[1]" अशी आहे यावरून तेथें महाराष्ट्री चालत होती हें निर्विवाद ठरतें. ( हिंदीमराठी ) म्हणींतील एकात्मता हाच मुद्दा पोषिते. आज हिंदीवर शौरसेनीपेक्षां महाराष्ट्रीचा पगडा[2] जास्त आहे. ( २ ) अर्धमागधींत पांचव्या शतकांत जैनांचे आगम सौराष्ट्र[3] देशांत लिहिले. अर्धमागधींत महावीरानें प्रथम[4] उपदेश केला. ही अर्धमागधी "महाराष्ट्रीमिश्रा[5]" होती. ( ६ ) संबळपूर जिल्ह्याच्या आसपासच्या जंगली जातीची[6] भाषा उरिया-मराठी-मिश्र आहे. हबळी[7] मराठीची पोटबोली आहे. त्या भागांतील महार समाज शुद्ध मराठी बोलणारा स्थायी[8] वस्तीचा आहे. ( ४ ) धारवाड विजापूर ते मद्रास इलाखा अखेर चालू असलेली सरकार दरबारची मराठी १८६९ च्या सुमारास इंग्रजांनीं नष्ट[9] केली. ( ५ ) म्हैसूर संस्थानांत शकपूर्वकाली संस्कृत प्राकृत भाषेंतील विपुल वाङ्मय[10] आहे. शिमोगा चित्तलदुर्ग जिल्ह्यांत महाराष्ट्रींतील शिलालेख शक[11]कालांतील आहेत. १० व्या शतकांतील चालू मराठीचें पहिलें वाक्य श्रवणबेळगोळ[12] येथें आहे. ( ६ ) महाराष्ट्रभाषेची दुसरी अवस्था जी महाराष्ट्री

---

१ मार्कंडेयकृत प्राकृत सर्वस्व.

२ P. 7, Vol. VII, Grierson's Linguistic Survey of India.

३ P. 17, Prakrit Languages by Dr. S. M. Katre.

४ ( १ ) समवायाङ्गसूक्त ३४, पान ६०; ( २ ) औपपात्तिकसूक्त ५६, पान ६१ ( Lenman ), ( ३ ) भगवतीसूक्त श्लोक ४ था; ( ४ ) आवश्यक निर्युक्ति.

५ क्रमदीश्वराचें संक्षिप्त सार : ५ : ९८

६ P. 348 part I Table XV, C. P. & Berar 1931 Census Report.

७ Grierson's Linguistic Survey of India Vol. VII, P. 330 ff.

८ समक्ष पाहून केलेलें विधान.

९ P. 45. Bom. Gaz. Vol. XXII Dharwar ( 1884 Ed. )

१० Mysore Gaz. Vol. II, Part I, Pages 401–4 (1930 Ed.)

११ Mysore Gaz. ( Rice 1877 ) Vol. I Pages 292–94

१२ महाराष्ट्रसाहित्य पत्रिका जुलै १९४२ पाने २६७ ते ७४

अपभ्रंश तिच्यांत विपुल जैनवाङ्मय आहे व तें गुजराथेंत पट्टण व वऱ्हाडांत कारंजा येथें आहे. (७) १० व्या शतकांत अपभ्रंश महाराष्ट्रांतील[1] व चालू मराठींतील रूपे माळव्यांत उपयोगांत होती.

## महाराष्ट्र समाज

महाराष्ट्र समाजाचा जन्म अवन्ती देशांत त्याच्या विशिष्ट संस्कृतीच्या व विवक्षित भाषेच्या प्रकर्षामुळें झालेला मानावा लागतो व तो काल शकपूर्व ५००० वर्षांचा असावा असें म्हणावें लागतें, तरी शकोत्तर पहिल्या[2] शतकापर्यंत महाराष्ट्र-समाजवाचक उल्लेख नाहीं. प्रादेशिक नांवें वैदर्भीभीम, वैदर्भीकौडण्य, विदर्भ-राजदुहिता, आश्मकराजा, करहाटक ब्राह्मण, लाड (लाट) ब्राह्मण, कुंतलेश अशीं शकपूर्व ३००० वर्षांपासून शकोत्तर १० व्या शतकापर्यंत सापडतात. राजशेखरानें आपल्या आजाचें वर्णन (८ वें शतक) "महाराष्ट्रचूडामणी"[3] असें केलें आहे.

भावी महाराष्ट्रदेशाच्या घडणीच्या सुलभतेसाठीं व स्पष्ट निर्देशासाठीं महाराष्ट्रीय समाजाची व्याख्या करणें प्राप्त आहे.

## महाराष्ट्रीय (व्याख्या)

**वंशपरंपरया महाराष्ट्रीयकुलोत्पन्न असा जो, तो जन्मजात महाराष्ट्रीय** होय. वैदिक आर्यांतून महाराष्ट्र समाज निर्माण झाल्यानंतर जे अनेक महाराष्ट्रियेतर महाराष्ट्रांत येऊन राहिले व महाराष्ट्रीय समाजांत सामावून गेले ते सर्व आतां वरील व्याख्येप्रमाणें महाराष्ट्रियांत अंतर्भूत आहेत. अनेक धर्म व अनेक पंथ उत्तरेंतून व दक्षिणेंतून महाराष्ट्रांत आले तसेच पश्चिम समुद्रांतूनहि आले. अशा पैकीं १६ व्या शतकापर्यंत जे जे आले ते आपलें धार्मिक व पंथीय वैशिष्ट्य राखून सुद्धां महाराष्ट्रीय बनले. जैन, इस्रायल, शिद्दी, माध्व, लिंगायत, आंध्र, लेवाकुणबी, लेवागुजर, जंबू इत्यादि इतिहासकालीन समाज व सारस्वत, कायस्थ, चित्पावन, लाड इत्यादि इतिहासपूर्व कालीन समाज आज पूर्णतया संस्कृति व भाषा यांसह महाराष्ट्रीय झाले आहेत. १६ व्या शतकापासून आलेल्या मुसलमान व ख्रिश्चन समाजाला दूर राखलें, पचवून घेतलें नाहीं, त्यामुळें त्या

---

१ P. 126–7 सरस्वती कंठाभरण (काव्यमाला ९४) Baroda Series.

२ (१) वात्स्यायन कामसूत्र २ : ४; ११; (२) पान १०७–९ मणिमेख लाई (तामीळ काव्य)

३ राजशेखरकृत बालरामायण, श्लोक १३ व पुढील गद्य.

दोन्ही धर्मांत बाटलेले महाराष्ट्रीय अलग राहिले व त्यांची संस्कृतिहि निराळीं राहिली. तरी सुद्धां हा सर्व जन्मजात अनुवंशिक महाराष्ट्रीय समाज होय.

शिवाजीचें स्वराज्य स्थापन होऊन महाराष्ट्र सत्ता, वैभव, संपत्ति, दरारा यांनीं सुसज्ज झाल्यामुळें भारतीय राज्यसत्तांचें व परदेशस्थ व्यापाऱ्यांचें लक्ष्य-केंद्र झाला. अशाच वेळीं महाराष्ट्राला व्यापार, धंदे, कला, शास्त्रें, कारखाने यांनीं स्वयंपूर्ण व वैभवशाली करण्यासाठीं अनेक परप्रांतस्थ व्यापारी, कलावान्, कारखानदार, शास्त्री, पंडित, धंदेवाले, सैनिक शिवाजीनें, व नंतर पेशव्यांनीं पुण्याला राजधानी केल्यानंतर पुण्यांत, आणले. अशा अनेक हजार परप्रांतस्थांचें जाळें प्रथम पुण्यास व नंतर आंतील मोठ्या पेठांतून आणि आतां खेडोपाडीं गुजराथी, मारवाडी व परदेशी, रजपूत यांचीं घराणीं १०–१५ पिढ्या होऊन गेलेलीं अशीं आज आढळतील. यांचे वंशज अनेक संस्कारांनीं महाराष्ट्रीयवत् बनले आहेत पण त्यांना आपण महाराष्ट्रीय झालों याची जाणीव नाहीं. त्यांच्या मनाला तशी शिकवण व्हावी व महाराष्ट्राचें राष्ट्रीयत्व ठळकपणें त्यांना जाणवावें अशी राजसत्तेची व्यवस्था नाहीं, त्यामुळें आणि पुराणमतवादी वृत्तीमुळें त्यांचें स्वकीय ज्ञाति-वैशिष्ट्य अद्याप जिवंत आहे.

गेल्या १५० वर्षांत इंग्रजांच्या पदरांत पेशव्यांचें राज्य पडल्यानंतर परदेशी मालाचे मुख्य आयातदार इंग्रज व त्यांचे एतद्देशीय आडते म्हणून पारशी, मारवाडी, गुजर, इत्यादि समाज प्रथम मुंबईत नंतर पुणें व इतर शहरांतून व्यापाराचे निमित्तानें आले व तदनंतर कारखानदार भांडवलवाले म्हणून स्थिर झाले. अशा सहस्रावधी परदेशीयांनीं आज महाराष्ट्र गजबजून गेला आहे. त्यांच्या अनेक पिढ्या येथें झाल्या असून त्यांची आर्थिक मगरमिठी इतकी घट्ट आवळलेली आहे कीं खेड्यापाड्यांतून व्यापारी-सावकारी, घरमालकी, जमिनधनी या नात्यानें त्यांनीं महाराष्ट्राच्या नाड्या आवळून धरल्या आहेत. महाराष्ट्रांत कमींत कमी २५–४०% पर्यंत असे परप्रांतीय आहेत. पुणें-मुंबईत ५० टक्के आहेत. (कोष्टकें पाहा) महाराष्ट्रांतील हे बहुसंख्य परप्रांतीय लोक महाराष्ट्राची स्थिरप्रजा होऊनहि त्यांना अद्याप महाराष्ट्रियत्वाची जाणीव झालेली नाहीं. राष्ट्रसभा व तत्समसंस्थांच्या महाराष्ट्र, मुंबई, विदर्भ, मराठी मध्यप्रांत या चार प्रांतिक समित्या आहेत त्यांचे सत्ताधारी, तसेंच पुणें, मुंबई, सोलापूर येथील नगरपालिकेंतील निवडलेले बहुतेक प्रतिनिधी व अधिकारी या अशा परप्रांतियांपैकींच आढळतात; पण त्यांना आपण महाराष्ट्राचे प्रतिनिधी

आहोत, ही जाणीव नाहीं. तशी शिकवण अद्याप त्यांना मिळालेली नाहीं. या सर्वांचें कारण महाराष्ट्र राजसत्तान्वित होता तेव्हां त्यानें तशी जाणीव देण्याची दक्षता घेतली नाहीं; आणि आतां इंग्रजी सत्ता झाल्यावर महाराष्ट्र स्वतंत्र राजसत्ताधारी प्रांत नसल्यामुळें व राष्ट्रीयवृत्तीचे (Nationality)[1] शिक्षण विद्यालयांतून दिलें गेलें नाहीं म्हणून हे सर्व परप्रांतीय अद्याप परदेशीच राहिले आहेत.

आज हा समाज वास्तव्यानें महाराष्ट्रीय असला तरी वृत्तीनें महाराष्ट्रीयेतर अशाच मनोभावनेचा आहे. भावी महाराष्ट्र राजसत्तेंत त्यांना महाराष्ट्रियत्वाची दीक्षा देऊन स्वकीयांत पचवून घेतलें पाहिजे. हा सर्व उपरी-महाराष्ट्रीय समाज होय. या उपरी–महाराष्ट्रियांनीं (domiciled) **भावी महाराष्ट्र प्रांताला आपली भूमाता व महाराष्ट्र भाषा ही व्यवहारभाषा स्वीकारून राहण्याचें मान्य केलें कीं त्यांना महाराष्ट्राचें नागरिकत्व स्वभावतः मिळालें पाहिजे अशी व्यवस्था भावी महाराष्ट्र-प्रांतसत्तेंत केली पाहिजे.**

**भावी महाराष्ट्र प्रांताचे रहिवासी (१) जन्मजात आनुवंशिक महाराष्ट्रीय व (२) उपरी (domiciled) महाराष्ट्रीय अशा दोन प्रकारचे राहतील. अशांचें महाराष्ट्रियत्व धर्म, पंथ, जाति, व्यवसाय भेदातीत एकरूप व समभावाचें रहावयाचे आहे.**

## महाराष्ट्रदेश

महाराष्ट्राचा जन्म अवन्ती देशांत, पुढें महाराष्ट्रीय नांव पावलेला समाज निर्माण झाल्यामुळें, झाला आहे. या महाराष्ट्रियांची एक शाखा विंध्यपर्वत व नर्मदा नदी ओलांडून दक्षिणापथांत उतरली व तिनें अश्मक[2], माहिष्मती[3], विदर्भ, कोसल, नाशिक्य, करहाटक, पेठनिक[4], मूलक, कुंतल, माहिषक[5] इतक्या नव्या वसाहती

१ Nationality या संज्ञेला स्वतंत्र राष्ट्रांत राजकीय महत्त्व आहे व त्याची नोंद होते. भरतखंडाच्या आजच्या राज्यव्यवस्थेंत ही संज्ञा नाहीं व तशी नोंदहि होत नाहीं.

२ (a) Routes No. 5 and 6 shown in in the Article "*Routes Between.* आर्यावर्त *and* दक्षिणापथ" by this author published in "Dr. B. C. Law" Vol. I.


(b) महाभारत पर्व ३ रें अध्याय ५८ श्लोक २० व २१ (B. O. R. I.Ed).

३ pp. 45 and 53-4 Carmaichael Lectures (1948) by Dr. D. R. Bhandarkar.

४ सुत्तनिपात. Verses 977 and 1101.

५ (अ) महावसो १२:३; पान ६६ (प्रो. के.एन. भागवत संपादित १९३८ आवृत्ति)
(आ) रामायण काण्ड ४:४१ श्लोक ९७६–७७
(इ) कौटिलीय अर्थशास्त्र (ले. करंदीकर व ढिवरेगावकर) पान २४ (संहिता).

## ऐहोळे शिलालेखाधारें संभवणारें तत्कालिन महाराष्ट्राचें क्षेत्र.



केल्या. दुसरी शाखा प्रथम अवन्तीच्या उत्तरेस गूर्जरत्रा भागांत जाऊन नंतर पश्चिमेकडे वळली व दोहदमार्गें[२] अरवली पर्वताच्या खिंडींतून आनर्त, सौराष्ट्र, लाट या आजच्या गुजराथ-काठेवाड भागांत वसाहती केल्यावर दमणगंगा नदी ओलांडून अपरान्ताच्या मध्यकोंकण व दक्षिणकोंकण या भागांत मंगळूरपर्यंत दक्षिणेस जाऊन पोचली.

महाराष्ट्राचा जन्म अवन्ती देशांत वेदरचना चालू होती तेव्हांच झाला एवढेंच नव्हे तर विदर्भाची वसाहत शकपूर्व ३००० वर्षांइतकी[३] तरी खास प्राचीन आहे. विदर्भाची संस्कृति श्रेष्ठ प्रतीला पोचल्यामुळेंच श्रीकृष्णानें रुक्मिणीचें समान संस्कृतीमुळेंच पाणिग्रहण सहज केलें. इंदुमती[४], केशिनी[५], दमयन्ती[६] या रुक्मिणीपूर्वकालीन विदर्भकन्या इतिहासप्रसिद्ध आहेत. गोदावरी हें नदीचें नांव वैदिक व्याकरणनियमान्वयें सिद्ध झालें असें भाषाशास्त्री मानतात. यावरून गोदावरीपर्यंतची वसाहत वेदकालीन मानणें भाग आहे. महाराष्ट्राच्या वसाहतीचा प्राचीनपणा याप्रमाणें सिद्ध होत आहे.

महाराष्ट्र देशाचे प्रादेशिक विभाग म्हणून जितक्या नांवांचा वर उल्लेख केला आहे त्यांत ९९०००[८] हजार गांवें होतीं असें ६ व्या शतकांतलि वर्णन आहे.

एवढ्या विस्तीर्ण महाराष्ट्रदेशाचा क्षेत्रसंकोच १२ व्या शतकाच्या थोडा आधीं झाला. १२ व्या शतकांत "नर्मदाकर्नाटकयोर्मध्ये महाराष्ट्रविषयः[९]" अशी व्याख्या सांपडते. महानुभावांनीं "महाराष्ट्री असांवें[१०]" असा दंडक घातल्यामुळें

१ (1) P. 501, Vol XXIII Annals of B. O. R. I. (2) Page 340, V. Smith's Early History of India (1924 Ed.)

२ Page IX, Vol. IX Part I Gujarat Population of the Bombay District Gazeteer Series.

३ शतपथ ब्राह्मणाचा काळ P. 245 Ind. Ant. Vol XXIV व ज्ञानकोश भाग २ पान ४०९ (परिशिष्ट A पान १–२). या ब्राह्मणांत वैदर्भी, कौडण्य याचा उल्लेख (१४:५:५:२२) आहे.

४ रघुवंश, सर्ग ५ वा श्लोक ३९–४०.

५ रामायण बालकांड अध्याय ३८, श्लोक ३ रा.

६ महाभारत वनपर्व अध्याय ५२, श्लोक १३


७ P. 273, Ind. Aut. V. XXX.

८ Ihole Inscription: B. O. R. I. Annals P. 494 ff. Vol. XXVI.

९ वात्स्यायनकृत कामसूत्रावरील जयमंगला टीका; २ : ५ : २९ वरील टीकेंत.

१० आचारस्थळ-त्यागप्रकरण, पानें ५४, ५७, ५८

महानुभाव पंथसंस्थापक चक्रधर (१२ वें शतक) यांनीं "महाराष्ट्रीं असावें" असा दंडक सांगितला, त्या महाराष्ट्राचें क्षेत्र कोणतें हें १३ व्या शतकांत "खंडमंडळें" आणि चतुस्सीमापूर्वक खालील भूचित्रांत दाखविल्या-प्रमाणें सांगितलें आहे.



त्यांना महाराष्ट्राचें क्षेत्र सांगावें लागलें आहे तें, ॥ "विंध्यापासोनि दक्षिणेसी ॥ झाडीमंडळापासोनी पश्चिमेसी ॥" निरनिराळ्या खंडमंडळांचा महाराष्ट्र, असें वर्णिलें आहे. त्याची दक्षिणसरहद्द ॥ फलेठाणापासोनि जेतुला ठाई मऱ्हाठीभाष वेर्ते ॥ तेथपर्यंत व "पूर्वे समुदवेरी" पर्यंत होती. गोव्यास १२ व्या शतकांतील लेख आहेत. मंगलोरपर्यंतच्या महाराष्ट्रभाषेचा परिणाम ९ व्या शतकांत तेथून मदुरेस गेलेल्या सौराष्ट्र[3] ब्राह्मणांच्या भाषेवर झाला आहे, यावरून ९ व्या शतकांत मंगळोर भागांत महाराष्ट्रभाषा चालू होती असें मानावें लागतें.

१२ व्या शतकानंतर लवकरच वैनगंगेच्या पूर्वेच्या भागांतून महाराष्ट्राची पिछेहाट झाली, ती वैनगंगा प्राणहिता होऊन गोदावरीला मिळते तेथपासून आदिलाबाद, निजामाबाद, बीदर, गुलबर्गा, अक्कलकोट यांचा पूर्वभाग कापीत आली आणि बेळगांव व कारवार जिल्ह्यांचा ईशान्य ते नैर्ऋत्य असा तिरपा तुकडा कापून गोकर्णापर्यंत हटत गेली.

गोकर्णापासून मंगळोरच्या भागांत महाराष्ट्रभाषाभाषी महाराष्ट्रीय अडीच लक्ष आहेत, पण ते अखंड भागांत आहेत कीं विखुरलेले आहेत याचा अद्याप शोध घ्यावयाचा आहे.

या सर्व प्राचीन व अर्वाचीन माहितीचा उपयोग महाराष्ट्र प्रांताचें क्षेत्र निश्चित करावें लागणार आहे, त्यावेळीं व्हावयाचा असल्यानें ती सविस्तर दिली आहे.

## भावी महाराष्ट्रप्रांतरचना

भरतखंडाच्या राज्यव्यवस्थेची जी घडण होऊं घातली आहे त्यापैकीं हल्लीचे प्रांत जे खिचडी स्वरूपाचे बनले आहेत ते (१) इंग्रजी सत्तेपैकीं तीन प्रांतांत, (२) ब्रिटिश सत्तेखालील सुमारें २२ संस्थानांत, (३) आणि पुर्तुगीझ सत्तेखालील दोन विभागांत अशा २७ प्रादेशिक सत्तांत विभागला गेला आहे. या २७ भागांचें एकत्रीकरण करावयाचें आहे.

---

१ महानुभावीय मराठी वाङ्मय (य. खु. देशपांडे), पान ९० मधील ऋद्धिपूर वर्णनांत.

२ पान २, उपोद्घात, चक्रधर सिद्धांतसूत्रें (नेने–भवाळकर)

३ सौराष्ट्र ब्राह्मण मूळचे सौराष्ट्राचे असले पाहिजेत; ते ५ व्या शतकांत मदुरेला पोंचले असें दिसतें. त्यांच्या सौराष्ट्री भाषेंत महाराष्ट्रभाषेचे शेंकडा ७०–७५ शब्द आहेत त्याचें कारण हा सौराष्ट्र समाज कोकणपट्टींतून मार्गाक्रमण करीत मंगळूरपर्यंत गेला व तेथून सह्याद्रीच्या वेळवयांतून (घाटांतून) पूर्वेकडे जाऊन मदुरेस पोंचला असावा. या मार्गाक्रमणाच्या काळांत त्यांच्या भाषेंत मराठी शब्दांनीं प्रवेश केला, याशिवाय दुसरें अनुमान निघत नाहीं.

हें एकत्रीकरण, जर महाराष्ट्र नांवाचा प्रदेश यापूर्वी निश्चित होऊन गेला असता, अथवा हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत (Nationality) प्रांतियत्वानुसार नोंदणी केली गेली असती तर फार सोपें गेलें असतें. लोकव्यवहारांत महाराष्ट्रदेश व महाराष्ट्रीय समाज या संज्ञा रूढ आहेत पण राजदरबारीं त्यांची नोंद नाहीं. ही अडचण खानेसुमारींतील भाषक संख्येच्या साहाय्यानें सोडवावी लागणार आहे. अर्थात् हा मार्ग निरपवाद नाहीं. यांतहि पुन्हा दुसरी आणखी एक धोंड आहेच ती म्हणजे कोणत्या बोलभाषा महाराष्ट्राच्या समजाव्या, ही होय.

## सरकारी शास्त्रज्ञ अधिकाऱ्यांनीं केलेल्या चुका

जातींचे इतिहास, शिरगणतीचे अहवाल आणि भारतीय आर्यभाषांची पाहणी (L. S. I.) या ग्रंथांतून त्या चुका झाल्या. त्या अधिकारी शास्त्रज्ञांनीं केल्या असल्यामुळें त्या चूक असतील ही कल्पनाहि कोणा महाराष्ट्रियांना आजवर झाली नाहीं. हे शास्त्रज्ञ परदेशस्थ असल्यानें त्यांना स्थानिक समाजाचे, त्यांच्या चालीरीतींचें, जातीधर्मांचे, भाषाभेदांचे सूक्ष्मभेद कळणें अशक्य आहे. त्यांची एकदेशीय शास्त्रीय दृष्टि व हाताखालच्या अज्ञ हस्तकांनीं पुरविलेली विपरीत माहिती, अशा आधारावर काढलेले निष्कर्ष चूक असणार नाहींत तर काय होईल? या चुका सरहद्द भागांत होतात तेव्हां त्या हानिकारक ठरतात; असेंच महाराष्ट्र विषयक माहितींत झालें आहे. (१) जव्हार ते नवसरी टापूंतील (डांग) कोंकणी समाज, भाषा, वंश, सामाजिक चालीरीती, नांवें-आडनांवें, देवता, शरीरठेवण, वस्त्रपेहराव इतक्या सांस्कृतिक चिन्हांनीं महाराष्ट्रीय आहे पण त्याला भिल्लांत जमा धरून भाषाहि भिल्लीची बोली ठरविल्यानें हा सुमारें ३ लक्ष वस्तीचा प्रदेश महाराष्ट्रांत केव्हांच धरलेला नाहीं. या प्रदेशासंबंधी विशेष लक्षांत घेण्यासारखी चुकी राज्यव्यवस्थेकडून घडली आहे, त्यामुळें हा समाज महाराष्ट्रियेतर होत चालला आहे, ती अशी:—या भागांत धरमपूर, वांसदा, ब्रिटिश डांग व बडोदें राज्यांतील डांग आणि सुरगाणा असे पांच संस्थानी भाग आहेत. बडोदें राज्यांतील डांग सोडून चारी संस्थानें एकदा नाशिक कलेक्टरच्या अमलाखालीं होतीं तेव्हां महाराष्ट्रीय नोकर त्या भागांत जात. १९३५ पर्यंत सुरत कलेक्टरच्या अधिकाराखालीं धरमपूर, वांसदा आणि डांग होतीं तेव्हां ती गुजराथी भाषा व संस्कार शिकूं लागली. सुरगाणा आरंभापासून महाराष्ट्रीय जिल्ह्याच्या अमलांत असल्यामुळें पूर्ण महाराष्ट्रीय

१ युरोपियनांनीं भारतीय इतिहासादि विषयांवर जितके ग्रंथ लिहिले त्यांतील माहिती मिळविण्यासाठीं, व त्यावरील अनुमानें ठरवितांना त्यांनीं सहाय्यक म्हणून एतद्देशीय लोक नोकरीस ठेविले होते. या नोकरांच्या चुका, दुराग्रह, अज्ञान यामुळें त्या युरोपियनांचे ग्रंथ चुकीचे व विपर्यस्त झाले आहेत. युरोपियन पंडितांची शास्त्रीय कुशाग्रदृष्टि एतद्देशीय हस्तकांना नव्हती.

२ जव्हार ते नवसारी भाग, खानदेश, छत्तिसगड, कानडी भाषाभाषी प्रदेश या सरहद्दीवरील विभागांत या चुका झाल्या आहेत.

राहिला. आतां सुरगाण्यासुद्धां सर्व बडोद्याच्या रेसिडेन्टच्या अमलाखालीं गेल्यानें आणखी २५ वर्षांनीं सुरगाणासुद्धां धरमपूर, वांसदा, व डांग ही संस्थानें गुजराथी बनतील, आणि महाराष्ट्र या प्रदेशाला मुकेल. ( परिशिष्ट १ लें पहावें. )

(२) खानदेशी बोली अहिरांची भाषा ठरवून तिला गुजराथींत ढकललें पण तिला भिल्लांची बोली मानलें आहे. परंतु हें डॉ. ग्रीअरसनचें मत पहिल्या शिरगणती अहवाल लेखकानें धुडकावून देऊन ती बोली मराठींत धरली; दुसरा तटस्थ राहिला व १९३१ च्या अहवाललेखकानें ग्रीअरसनचें अनुमान चूक दाखवून सुद्धां ही बोली मराठींत धरली नाहीं. आतां अहिराणी बोलणारे लोक आपली भाषा मराठी सांगूं लागल्यानें शास्त्रज्ञांच्या निष्कर्षाचा व्यवहारावर परिणाम झाला नाहीं ही गोष्ट निराळी. अहिराणीच्या पोट बोली बोलणाऱ्या जाती भिल्लांत धरल्या असून त्यांना महाराष्ट्रियेतर समजलें जात आहे.

(३) सातपुड्यांतील व झाडीमंडळांतील गोंडांना अहिंदु ठरविण्याचा अट्टाहास आहे. ग्रिगसन नांवाचे बस्तर संस्थानचे व्यवस्थाधिकारी होते त्यांनीं हळबा लोकांत मिसळून मिळविलेल्या माहितीच्या आधारें त्यांना गोंड ठरविलें आहे, त्याची भाषा हळबी ही मराठीची बोली असें डॉ. ग्रीअरसन सिद्ध मानतात. त्याउलट ज्या एका मिशनऱ्यानें त्या समाजांत अनेक वर्षें काढलीं तो त्यांना हिंदू म्हणतो.

(४) भंडारा जिल्हा व कवरधा संस्थान येथें जो पोवार समाज आहे त्याला माळव्यांतील म्हणजे हिंदी समाजांत धरलें आहे. हा समाज महाराष्ट्रसंस्कृतीचा मराठी भाषा बोलणारा आहे.

(५) कृष्णा व तुंगभद्रा नद्यांच्या कांठचा म्हणजे ऐतिहासिक कुंतल देशाच्या रहिवाशांना कन्नडिग ठरविलें आहे. कारण ते कानडी भाषा बोलतात. पण हे "कन्नडिग," वंशानें आर्य आहेत. द्रविडी नव्हत. ते बोलतात ती कानडी त्यांना परकीय आहे. त्यांचे सर्व संस्कार म्हणजे वंश, सामाजिक चालीरीती, धार्मिक व्यवहार, लग्नसंबंध, देवता, वस्त्रपेहराव, अन्नपद्धत, शरीरठेवण महाराष्ट्रीय आहेत. अस्सल कन्नड देश जो म्हैसूर संस्थान त्याचें यापैकीं एकाशींहि साधर्म्य नाहीं. हे कन्नडिग म्हणविणारे कानडी भाषा बोलणारे महाराष्ट्रीय आहेत.

(६) वेंगुर्ल्यापासूनची त्रिवेंद्रम् पर्यंतची कोंकणी ग्रीअरसननें मराठीची नव्हे असें ठरविलें आहे. व त्यास अनुसरून शिरगणति अहवाललेखकानें हिला मराठींतून काढलें आहे. हे १० लक्ष कोंकणीभाषाभाषिक सर्वस्वी महाराष्ट्रीय होत व त्यांची कोंकणी महाराष्ट्रभाषेची प्रादेशिक बोली आहे. (परिशिष्ट २ रें पहावें.)

अधिकारपदस्थ युरोपीय पंडितांनीं इतक्या चुका केल्या आहेत. महाराष्ट्रीय एकीकरणाला अथवा संयुक्तीकरणाला त्या बाधक झाल्यावांचून रहात नाहीं.

१ Page 328, Bombay Presidency 1931 Census part I.
२ Page 338, 1931 Census, Bombay Presidency. Opinion about the Bhils given by Rev. Enoch Hedberg.
३ L. S. I. Vol. VII. P. 330 ff.

### भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व निरपवाद नाहीं.

ज्या भूभागांत एक भाषा बोलणारा समाज बहुसंख्य असेल त्यांचा एक प्रांत करावयाचा असा या तत्त्वाप्रमाणें विनियोग व्हावयाचा आहे. या विनियोगांत अनेक वैगुण्यें राहणार आहेत तीं:—एक, सरहद्दीवर शेजाऱ्यांची भाषा बोलणारा पण संस्कृतीनें पहिल्यांपैकीं असतांना, तो शेजाऱ्यांची भाषा बोलतो म्हणून पहिल्यांत न मोजतां शेजाऱ्यांत धरला जाईल, ही चुकी होणार, हें होय. या चुकीमुळें (१) खानदेश व नाशिकच्या पश्चिमभागांतील कोंकणा समाज (२) वऱ्हाड व मराठी मध्यप्रांतांतील गोंड–भिल्ल व इतर वन्य समजले जाणारे समाज (३) हळब व तत्सम मानीव वन्यजातीय समाज (४) धारवाड, विजापूर, बेळगांव, गुलबर्गा, रायचूर, कारवार या जिल्ह्यांतील कानडी बोलणारा महाराष्ट्रीय (५) मंगळोर ते त्रिवेंद्रमपर्यंतचा कुडुबी व कोंकणी बोलणारे समाज; इतक्या म्हणजे सुमारें २९ ते ३० लक्ष स्वकीयांना महाराष्ट्र मुकणार आहे; दुसरें वैगुण्य, जे परप्रांतीय आणि परदेशीय १०–१९ पिढ्या महाराष्ट्रांत राहिले असल्यामुळें उत्तम रीतीनें महाराष्ट्रभाषा बोलतात, त्यांची जन्मभाषा महाराष्ट्रेतर नोंदली जाते पण त्यांना प्रांतियत्वानें महाराष्ट्रीय मानलें जात नाहीं व भाषाभेदामुळें महाराष्ट्रियेतरांत गणलें जाईल, अशांची संख्या महाराष्ट्रांत $\frac{9}{8}$ भरेल. हा दोष फार मोठा आहे. तिसरें वैगुण्य, हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत "प्रांतियता" (Provinciality) या समान भूमिकेच्या एकात्म भावनेला जन्म दिलाच नाहीं. राष्ट्रीयता हा सुधारलेल्या जगांतील एकात्मभावनेनें एका भूमींतील जनता एकरूप होण्याला सर्वोच्च उपाय गणला जातो. भरतखंडाला इंग्रज राजसत्तेनें त्या गुणाचें ज्ञानच होऊं दिलें नाहीं, उलट जातीय भेद वाढविले. महाराष्ट्रियत्वाच्या एकात्मतेला या वैगुण्यानें पुष्कळच कमजोर व स्वाभिमानविमुख केलें आहे. महाराष्ट्रीय म्हणजे महाराष्ट्रभाषा बोलणारा हिंदु अशीच समजूत सामान्यतः असते. मुसलमान, जैन, लिंगायत इत्यादि महाराष्ट्रीय बांधवांना अद्याप या समानभूमिकेची कल्पना येत नाहीं. क्वचित् मुसलमान, बहुतेक ख्रिस्ती, (पूर्तूगीझ ख्रिस्त्यांना ही भावना अद्याप उमगली नाहीं), थोडे लिंगायत (महाराष्ट्र लिंगायत समाज नांवाची एक संस्था निघाली आहे) यांना महाराष्ट्रीयत्वाची जाणीव आतां कोठें किंचित् होऊं लागली आहे. इस्रायलांना ही जाणीव आहे.

---

१ भरतखंडांतील प्रांत युरोपांतील एकेकादेशाहून मोठे व स्वयंनिष्ठ असल्यामुळें तेथील राष्ट्रीयता व येथील प्रांतियता यांचें स्वरूप एकच आहे.

## भाषेचेहि लचके तोडले आहेत !

इतक्या वैगुण्याचें हें भाषाप्रमुख प्रांतरचनेचें तत्त्व असून त्यांत आणखी महाराष्ट्रभाषेच्या तीन प्रादेशिक बोली महाराष्ट्रभाषेंतून वगळल्या आहेत. त्या तीन बोली म्हणजे खानदेशी, दक्षिण कोंकणी व उत्तर कोंकणी या होत. तितका भाषकांचा समाज व प्रदेश महाराष्ट्रांतून वगळला जाण्याचा संभव आहे. उत्तर कोंकणी महाराष्ट्रभाषेंत केव्हांच धरली नव्हती. ही बोली बोलणाऱ्या समाजाला व त्यांच्या प्रदेशाला महाराष्ट्र पूर्वींच मुकला आहे.

## भाषक संख्येच्या नोंदींतील वैगुण्य

भाषक संख्येची नोंद शिरगणतीच्या नोंदीवरून त्या अहवालांत उतरलेली असते. महाराष्ट्राच्या मध्यवर्ती जिल्ह्यांत ह्या नोंदीच्या चुका फारशा होत नाहींत. सरहद्द, जिल्हे तालुके व गांवें यांतील नोंदींत चुका होत आल्या आहेत. जिल्ह्यांच्या भाषक संख्या १९३१ पर्यंत देत आहेत. १९०१ पर्यंत तालुक्यांच्या भाषक संख्या देत होते. १९११ पासून तें बंद केलें. गांवांच्या भाषकसंख्या कधींच दिल्या नाहींत. त्यामुळें एका भाषेच्या बहुसंख्य जिल्ह्यांत कोणते तालुके दुसऱ्या कोणत्या भाषेचे बहुसंख्य आहेत व तालुक्यांत कोणतीं गांवें इतर भाषा भाषकांचीं बहुसंख्य आहेत हें कळण्याचें साधन उपलब्ध नाहीं. १९४१ च्या शिरगणतीनें भाषकांचीं कोष्टकें केलेलीं नाहींत, त्यामुळें शिरगणतीचे अहवाल हे सुद्धां भाषाप्रमुख प्रांतरचनेचे निर्णायक साधन नव्हे.

## अप्रबुद्ध जनता असहकारी

भाषा व संस्कृतीच्या नोंदी बरोबर दिल्या जाव्यात या बाबतींत सामान्य जनता अप्रबुद्ध व अजाण असल्यानें सर्वजनमतनोंदणी ( referendum ) होईल तेव्हां ती किती अचूक आणि वस्तुस्थितिनिदर्शक होईल, ही शंका आहे. सामान्य जनता "मुकीं बिचारी कुणी हका अशीं मेंढरें" आहेत. मतलबी चळवळयांच्या आहारीं ती जाणार. यामुळें सर्वजनमतनोंदणीच्या कामीं जनता असहकारीच ठरणार.

## सदोष साधनांचाच आधार

अशा स्थितींत शिरगणति अहवालांतील भाषकसंख्या कितीहि सदोष असल्या तरी त्यांचाच आधार घेतल्यावांचून निर्वाह नाहीं, म्हणून त्या आकड्यांच्या साहाय्यानें महाराष्ट्राचें क्षेत्र दर्शविणारीं कोष्टकें तयार करून स्पष्टीकरणासह पुढें देत आहे. शिरगणति अहवालांतील मराठी भाषेचे म्हणून आकडे दिले आहेत त्यांत खानदेशी, उत्तरकोंकणी व दक्षिणकोंकणीचे आकडे मिळवून घेतले

नाहींत. या तीन्ही बोली महाराष्ट्रभाषेच्याच पोटबोली आहेत व महाराष्ट्रसमाजच बोलतो म्हणून त्यांचे आकडे महाराष्ट्रभाषा भाषकांच्या कोष्टकांतील संख्येंत मीं जमा धरले आहेत. ही महाराष्ट्राची भाषिक भागापुरती माहिती झाली. या माहितीनें निर्दोषपणें महाराष्ट्रियांचा महाराष्ट्र कळला असें होणार नाहीं. सांस्कृतिक कसोटीनें महाराष्ट्राचें क्षेत्र ठरवून घेतलें पाहिजे. ही कसोटी जे समाज महाराष्ट्रभाषा बोलत नाहींत पण संस्कृतीनें म्हणजे (१) वंशसाम्य (२) वस्त्रपेहरावसाम्य (३) अन्नपद्धतीसाम्य (४) शरीरसंबंध (५) व्यक्तिनांवें व आडनांवें यांचें साम्य (६) देवतासाम्य (७) सामाजिक चालीरीति–साम्य (८) धार्मिक आचार, व्रतें, सण–साम्य (९) राष्ट्रपुरुष व राष्ट्रीय उत्सव–साम्य, इतक्यांतून अधिकांश बाबींत एकता असली तर, जमली असें धरून, तो समाज महाराष्ट्रीय धरला पाहिजे व असा समाज सीमेवर असला तर तो प्रदेश महाराष्ट्रांत धरला पाहिजे. पुढील कोष्टकांत या कसोटीनें महाराष्ट्रीय ठरणारा समाज कळण्याचें साधन नाहीं.

### महाराष्ट्रीय समाज–घटक

भावी महाराष्ट्र समाजाचे घटक (१) जन्मजात अनुवंशिक महाराष्ट्रभाषा भाषक (२) अनुवंशिक महाराष्ट्र संस्कृतीचे पण कानडी भाषा बोलणारे (३) महाराष्ट्र संस्कृतिहीन महाराष्ट्रभाषाभाषक हळब समाज (४) मूळचे महाराष्ट्रीयेतर असून महाराष्ट्रभाषा व संस्कृतचे लेवागुजर व लेवाकुणबी (५) असिद्ध वंशाचे पण महाराष्ट्रीय बनूं लागलेले–गोंड व भिल्ल जाती (६) संस्कृतीनें व भाषेनें जन्मजात महाराष्ट्रीय पण अज्ञानी, दरिद्री व जंगलवासी कोकणा समाज (७) मिश्र संस्कृतीचा तेलंगी समाज (८) धर्मानें मुसलमान, जैन, लिंगायत, खिस्ती इस्रायल, बुद्ध इत्यादि पण जन्मजात महाराष्ट्रीय (९) गुजराथी, शिंदी, मारवाडी, कच्छी, छत्तिसगडी, पश्चिम हिंदी, तेलगू इत्यादि अनेक भाषाभाषक परप्रांतस्थ ( domiciled ) रहिवासी, इतके महाराष्ट्र समाजाचे घटक आहेत.

### भावी महाराष्ट्र प्रांताची व्याख्या

**जन्मजात महाराष्ट्र संस्कृतीचे महाराष्ट्र भाषक व वास्तव्यजनित** (domiciled) **अल्पसंख्य परप्रांतस्थ महाराष्ट्रीय समाज सलगपणें जेवढ्या भूभागांत—(जिल्हे, तालुके व गांवें) वसलेला आहे तो सर्व मिळून झालेला एकसांधी, एकावयवी भूप्रदेश महाराष्ट्र देश होय. आणि इतका हा सर्व महाराष्ट्र एका राजवटीखालीं** (Governors' province) **आला म्हणजे तो एकीकृत किंवा संयुक्त महाराष्ट्राचा राजकीयप्रांत सिद्ध झाला असें होईल.**

### भाषा-कोष्टकाबद्दल स्पष्टीकरण

महाराष्ट्र प्रांताचें क्षेत्र निश्चित करण्याचें एकमेव साधन जे जन्मभाषा असलेल्यांचे आकडे शिरगणति अहवालांत दिले आहेत, त्यांत खानदेशी, दक्षिण व उत्तर कोकणी बोली बोलणारांचे आकडे जमा धरले आहेत. या तिन्ही बोली बोलणारे महाराष्ट्रीय आहेत व त्यांचे भूभाग निसर्गदृष्ट्या महाराष्ट्राचे भाग आहेत.

**पुढील कोष्टकांत दर्शविलेल्या विभागापैकीं जे बहुसंख्याक म्हणजे ५० व अधिक टक्के महाराष्ट्रियांच्या वस्तीचे आहेत ते सर्व निर्विवादपणें महाराष्ट्राचे भाग होत. अल्पसंख्य असलेले सरहद्दीवरील विभाग सरहद्द समिति निश्चित करील. येथें ते फक्त सूचित केले आहेत. कोष्टकांतील विभाग प्रचलित राज्यव्यवस्थेप्रमाणें आहेत.**

### कोष्टकांतील आकड्यांसंबंधीं

पुढील कोष्टकांतील आंकडे अहवालांत आहेत तसेंच घेतले आहेत; त्यांत चूक न होऊं देण्याची व त्यांच्या बेरजाहि अचूक राखण्याची पूर्ण दक्षता घेतली आहे; तरीसुद्धां चुका राहिल्या असण्याचा संभव आहे. त्या सांपडल्यास लेखकास कळविण्याची कृपा करावी. शुद्धीकरणास सहाय्य होईल.

## भावी महाराष्ट्रप्रांताचें क्षेत्र व जनसंख्या

## ( १ ) आजचा बहुसंख्य महाराष्ट्र

### महाराष्ट्रभाषाभाषी बहुसंख्य विभागः—

( अ ) मुंबईप्रांत :—( १९३१ च्या शिरगणति अहवालावरून )

| | क्षेत्र चौरसमैल | महाराष्ट्रभाषा— भाषकसंख्या | एकूण लोक-संख्या |
|---|---|---|---|
| मुंबई शहर | २४ | ५९३७६० | ११६१३८३ |
| ठाणें जिल्हा | ३४२२ | ७२९६४२ | ८३६६२५ |
| नगर ,, | ६६११ | ८७००८४ | ९८८२०६ |
| पूर्वखानदेश जिल्हा | ४५५१ | ९६४१२० | १२०६०३५ |
| पश्चिम खानदेश जिल्हा | ६४०१ | ४०१४२६ | ७७१७९४ |
| नाशिक जिल्हा | ५८८२ | ८६८०४८ | १००००४८ |
| पुणें ,, | ५३३२ | १०३७०७५ | ११६९७९८ |
| सातारा ,, | ५०५३ | ११११२९४ | ११७९७१२ |
| सोलापूर ,, | ४५६९ | ६८५१८७ | ८७७५२० |

| | | | |
|---|---|---|---|
| मुंबई उपनगर जिल्हा | १५४ | ११५४८१ | १७९५२४ |
| कुलाबा ,, | २१६६ | ५९९६२३ | ६२८७२१ |
| रत्नागिरी ,, | ३९८९ | १२४९३७९ | १३०२५२७ |
| एकूण | ४८१५४ | ९२२५११९ | ११३०१८९३ |

( आ ) नागपूरप्रांत ( १९३१ चे आंकडे )

| | | | |
|---|---|---|---|
| वर्धा जिल्हा | २४३४ | ४००१३१ | ५१६२६६ |
| नागपूर ,, | ३८३४ | ७१२५३३ | ९४००४९ |
| चांदा ,, | ९३१२ | ५४८०११ | ७५९६९५ |
| भंडारा ,, | ३६२३ | ६१०१४० | ८२४४९६ |
| एकूण | १९२०३ | २२७०८१५ | ३०४०५०६ |

( इ ) वऱ्हाड

| | | | |
|---|---|---|---|
| उमरावती ,, | ४६९१ | ७२१५२८ | ९४१६०४ |
| अकोला ,, | ४०९१ | ७०७५४९ | ८७६३६२ |
| बुलढाणा ,, | ३७६६ | ६४७०९८ | ७६६५८४ |
| यवतमाळ ,, | ५२१९ | ५९६१०० | ८५७२८८ |
| एकूण | १७७६७ | २६७२२७५ | ३४४१८३८ |

| | | | |
|---|---|---|---|
| अ, आ, इ, ची एकूण | ८५१२४ | १४१६८२०९ | १७७८४२३७ |

## (२) उद्याचा बहुसंख्य महाराष्ट्र.

( ई ) मुंबई इलाख्यांतील संस्थानें ( १९३१ मधील आंकडे )

| | | | |
|---|---|---|---|
| जव्हार | ३१० | ५५९८५ | ५७२६१ |
| जंजिरा | ३२४ | ८४८७४ | ९८२०६ |
| भोर | ९२५ | १३९२५२ | १४१५४६ |
| औंध | ५०१ | ६५४६६ | ७६५०७ |
| फलटण | ३९७ | ५५६३२ | ५८७६१ |
| सावंतवाडी | ९२६ | २२५४८७ | २३०५८९ |
| कोल्हापूर | ३२१७ | ७६४८८८ | ९५७१३७ |
| कुरुंदवाड मोठे | १८७ | २१७७५ | ४४२०४ |
| कुरुंदवाड धाकटे | ११६ | १८४९६ | ३९५८३ |
| मिरज मोठे | ३४३ | ५६४११ | ९३९३८ |
| मिरज धाकटे | २११ | २१३३८ | ४०६८४ |
| सांगली | ११११ | १३६१७३ | २५८४४२ |

| | | | |
|---|---|---|---|
| जत | ९८१ | ४८४८८ | ९१०९९ |
| वांसदा | २१५ | २६७०९+ | ४८८३९ |
| सुरगाणा | ३६० | १५०७३+ | १५२४५ |
| धरमपूर | ७०४ | {७११७१ / १५०९ *} | ११२०३१ |
| डांग ( ब्रिटिश ) | ९९६ | {१८९२० / ६१३ *} | ३३७४८ |
| डांग ( गायकवाडी ) | ... | १०२४७ × | ...... |
| एकूण | ११८३४ | १७४८६८६ | २३९७८२० |

* धरमपूर व डांग ( ब्रिटिश ) या दोन विभागांतील महाराष्ट्र भाषाभाषकांचे १९३१ च्या शिरगणति अहवालांत दिलेले आंकडे चूक असून महाराष्ट्रीय ज्ञातींची संख्या७०९०१ व १८९२० अनुक्रमें आहे असें त्याच अहवालांत नमूद आहे. हे सर्व महाराष्ट्रीय होत व बहुसंख्य आहेत.

+ सुरगाणा व वांसदा संस्थानांतील महाराष्ट्रीय जाती व महाराष्ट्रभाषाभाषक यांचे आंकडे जवळ जवळ सारखे आहेत, ही वस्तुस्थिति डांग व धरमपूर संबंधींच्या वरील विधानाला पोषक आहे.

ह्या चार संस्थानाबद्दलची विस्तृत माहिती महाराष्ट्र विद्यापीठसमितीस पाठविलेल्या प्रश्नोत्तराच्या ( छापील ) पान ६ व ७, च्छेद १४ मध्यें सप्रमाण दिली आहे. ( परिशिष्ट १ लें पहा )

× हा आकडा १९४१ च्या बडोदें संस्थानांच्या शिरगणति अहवालांतील आहे.

( उ ) निजामराज्य–बहुसंख्य मराठवाडा ( १९३१ च्या शिरगणति अहवालावरून )

| | | | |
|---|---|---|---|
| औरंगाबाद जिल्हा | ६२१२ | ७४०६१४ | ९४४७९३ |
| बीड ,, | ४१३२ | ५५२६४२ | ६३३६९० |
| नांदेड ,, | ३७७१ | ४५०६२१ | ७२२०८१ |
| परभणी ,, | ५१२५ | ७०८७२० | ८५३७६० |
| उस्मानाबाद ,, | ३५२६ | ५४६७४९ | ६९१०६८ |
| * बीदर ,, | ४८२५ | ३२७५३८ | ८७३६१५ |
| एकूण | २७५९१ | ३३२६८८४ | ४७१९००७ |

* बीदर जिल्हा एकभाषी नाहीं, त्यामुळें मराठी बहुसंख्य असून ५०% पेक्षां कमी आहे.

| | | |
|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | ८७३६१५ = | १००% |
| मराठी | ३२७५३८ = | ३७.५% |
| कानडी | २६०७८२ = | २९.८% |
| तेलगू | १३३७८० = | १५.३% |
| इतर ६ भाषा | १५१५१५ = | १७.३% |

+ (ऊ) पूर्तुगीझ सत्तेखालील बहुसंख्य (१९३१)

| | | | |
|---|---|---|---|
| गोवाप्रांत | १४६१ | ५००००० (अंदाजी) | ५०५२८१ |
| नगर हवेली (दमण) | ६० | ३८२६० ,, | ३८२६० |
| एकूण | १५२१ | ५३८२६० | ५४३५४१ |

+ छेद (ऊ) मधील आकडे " गेल्या पावशतकांतील गोमांतक " लेखक के. अ. नायक (१९३८) पान १३३ व १५१ मधून घेतली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ई, उ, ऊ ची एकूण | ४०९४६ | ५६१३८३० | ७६६०४५८ |

| | | | |
|---|---|---|---|
| आजचा आणि उद्याचा | १२६०७० | १९७८१८६९ | २५४४४६९५ |

३ **अल्पसंख्य (सरहद्द) महाराष्ट्र.** प्रचलित राजकीय विभागांची केली गेलेली वाटणी अबुद्धिपुरस्सर केली गेली असली तरी त्यामुळें नैसर्गिक भूविभागांची चिरफाड होऊन दोन भाषांच्या सरहद्दी आज दीडशें वर्षे विसदृश समाजाशीं संलग्न होऊन राहिल्या आहेत. बहुसंख्य परभाषेच्या जिल्ह्यांच्या पोटवाटणींत ते बहुसंख्य महाराष्ट्रीय तालुके व गांवें यांचे गटांनीं आहेत. असे विभाग त्या परभाषेच्या जिल्ह्यांतून काढून सलग बहुसंख्य महाराष्ट्रास जोडावयास पाहिजेत. हे विभाग आज परभाषेच्या राजवटींत असले तरी महाराष्ट्राला चिकटूनच आहेत.

मुंबई प्रांतांतील बेळगांव व कारवार जिल्ह्यांतील १९३१, १९२१, १९११ या तिन्हीं शिरगणति अहवालांत तालुक्यांची भाषक–संख्या दिली नाहीं; म्हणून १९०१ च्या शिरगणती-मधील आंकडे खालीं दिले आहेत :—

(ए) बेळगांव जिल्ह्यांतील बहुसंख्य महाराष्ट्र भाषाभाषक

| तालुके | चौ. मैल | मराठीचे आकडे | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| बेळगांव तालुका † | ४७० | ४८९५६ | १०५५२८ |
| चंदगड ,, | १७५ | ३०३७८ | ३२०३४ |
| खानापूर ,, | ६३३ | ४८६४३ | ८१९०२ |
| एकूण | १२७८ | १२७९७७ | २१९४६४ |

† बेळगांव तालुक्यांत ३८५५४ लोक कानडी बोलतात तरी तेथें महाराष्ट्रीय संस्कृति-प्रधान जनता बहुसंख्य आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| तालुक्यांतील | एकूण | लोकसंख्या | १०५५२८ = १००% |
| ,, | ,, | मराठी बोलणारे | ४८९५६ = ४६·४ |
| ,, | ,, | कानडी बोलणारे | ३८५५४ = ३६·५ |
| ,, | ,, | इतर भाषा बोलणारे | १८०१८ = १७·१ |

(ऐ) कारवार जिल्ह्यांतील बहुसंख्य महाराष्ट्र भाषाभाषक तालुके :—

| | चौ. मैल | मराठी | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| कारवार तालुका | २८१ | ४२५५१ | ५८४६० |
| हल्याळ ,, | ४२८ | १९५०१ | ३५१२२ |
| सुपा ,, | ६२९ | १९०५३ | २१००८ |
| एकूण | १३३८ | ८११०५ | ११४५९० |

(ओ) बेळगांव व कारवार जिल्ह्यांतील जे अल्पसंख्य मराठी भाषकांचे तालुके आहेत त्यांपैकीं वरींच बहुसंख्य मराठी भाषाभाषकांचीं गांवें महाराष्ट्राला तोडून मिळालीं पाहिजेत असे तालुके :—

| बेळगांवजिल्ह्यापैकीं | | लोकसंख्या | कानडी | मराठी | कानडीशीं मराठीचें प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| अथणी | मिरज, कुरुंदवाड व कोल्हापूर संस्थानांना चिकटून | ११३०७७ | ८०७२३ | १९८९१ | ४:१ |
| हुकेरी | | ११८१४९ | ८९६७७ | १८२३२ | ५:१ |
| चिकोडी | | १८६४०० | ९२५४७ | ७८८१३ | ९:७ |
| | | | | ११६९३६ | |

कारवार जिल्ह्यांतील अल्पसंख्य मराठी तालुके समुद्र किनाऱ्यानें एकाखालीं एक अनुक्रमानें कारवार तालुक्याच्या दक्षिणेस आहेत, तेः—

| | | लोकसंख्या | कानडी | मराठी | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| अंकोला | समुद्रकाठचे | ३९६६५ | २७०४३ | ११४६० | ५:२ |
| कुमठा | ,, | ६६०४० | ४४१८५ | १९८८६ | ५:२ |
| होनावर | ,, | ६२४०६ | ३६०४८ | २४६२१ | ३:२ |
| भाटकळ | ,, | ३७६६८ | २५०५६ | ११४३० | ७:३ |
| यल्लापूर | बेळगांव जिल्ह्यापैकीं खानापूर या मराठी तालुक्याला लागून | २२८१४ | ११९७२, | ९०२७, | ४:३ |
| | | | | ७६४२४ | |

(औ) अक्कलकोट संस्थान सोलापूर व विजापूर जिल्ह्याच्या बेचक्यांत म्हणजे मराठी कानडच्या सीमेवर आहे.

| | लोकसंख्या | कानडी | मराठी | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| अक्कलकोट | ९२६०५ | ५०००३ | २७७७३ | ५:३ |

(अं) बारवाणी संस्थान (मध्यभारत) खानदेशच्या उत्तरेस आहे. या संस्थानांत व आसपास मराठी भाषा बोलणारीं कांहीं गांवें सलग आहेत. संख्या अजमासें २५००० आहे.

(अः) मध्यप्रांतांतील बहुसंख्य मराठी जिल्ह्याच्या उत्तरेकडील ४ जिल्ह्यांतील मराठी भागाशीं चिकटून असलेले कांहीं तालुके बहुसंख्य, कांहीं अल्पसंख्य, कांहीं अत्यल्पसंख्य (फक्त थोडीं खेडीं) मराठी भाषा भाषक आहेत, ते विभाग :—

(१) बहुसंख्य तालुके

| जिल्हा | तालुका | क्षेत्र चौ. मैल | लोकसंख्या | मराठी भाषक | हिंदी भाषक | गोंडी भाषक |
|---|---|---|---|---|---|---|
| नेमाड | १ बऱ्हाणपूर | ११३८ | १४५२४१ | ६२७६९ | ४७८०१ | ...... |
| बैतूल | १ मूलताई | ९७२ | १७०५९२ | ५९१९५ | ७९४६३ | ३०३४८ |
| | २ भैंसदेही | १३४० | ९३५५४ | २०३०१ | २००४९ | २९६८९ |
| छिंदवाड | १ सौसर | ११४४ | १७१५६२ | ८२३४३ | ३८१३६ | ४८०२१ |
| | एकूण | ४५९४ | ५८०९४९ | २२४६०८ | १८५४४९ | ...... |

(क) अल्पसंख्य मराठी तालुके बहुसंख्य मराठी भागाशीं सलग असलेले:—

| | लोकसंख्या | मराठी | हिंदी |
|---|---|---|---|
| बालाघाटजिल्हा १ बालाघाट तहशील, २ बालाघाट जमिदारी | १९६६४९ | ६५६०४ | १०८८४५ |
| दुर्गजिल्हा ३ बेमतारा संजारी + | १०६१०८ | ५९४२ | |
| | | ७१५४६ | |

+ बेमतारा संजारी तालुक्यांतील मराठीची संख्या अगदींच अल्प आहे; तरी हा भाग महाराष्ट्रांत धरला आहे याचें कारण चांदा व बस्तर या दोन बहुसंख्य मराठीच्या दोन्ही विभागांचा हा तालुका सांधा (Corridor) आहे, म्हणून तेथें मराठी भाषक संख्या याहून अधिक असावी. नोंदींत चूक असणार.

| | लोकसंख्या | मराठी | गोंडी |
|---|---|---|---|
| (ख) बस्तर संस्थान | ५२४७२१ | १७५४६३ | २६२९८८ |

या संस्थानांतील गोंडीभाषा मराठीला (हळबीला) सदृश आहेत. छत्तिसगडी (१२९४५) व ऊरिया (४८१२९) या ज्या दोन्ही आक्रमक भाषा आहेत त्यांच्याशीं गोंडी भाषांचा संबंध नाहीं. पण बस्तरशीं सामाजिक दळणवळण रायपूर (हिंदी–छत्तिसगडी) शीं गेलीं ५० वर्षें वाढत चालला आहे, तसेच राजकीय व आर्थिक संबंधहि जडले आहेत; उलट मराठी भागाशीं असलेले रक्ताचें व भाषेचें नातें तुटत चाललें आहे; या दोन कारणामुळें बस्तर महाराष्ट्राला पचवितां येईल कीं नाहीं अशी शंका येते.

(ग) निजाम–मराठवाड्याला लागून असलेले अल्पसंख्य जिल्हे; पण त्यांतील बहुसंख्य मराठी तालुके व गांवें मराठवाड्यापैकीं आहेत, ते तोडून द्यावयास पाहिजेत.

| जिल्हे | लोकसंख्या | मराठीभाषक संख्या |
| --- | --- | --- |
| आदिलाबाद | ७६२०३० | १५९५०९ |
| गुलबर्गा | १२२५००८ | १९८९५० |
| निजामाबाद | ६३३२२५ | ८३६५ |
| | | ३६६८२४ |

निजामाबादच्या नोंदी खास चूक आहे. याचें पूर्वीचें नांव इंदूरबोधन. हा मारवाड्यापैकीं जिल्हा आहे.

(घ) मद्रास इलाख्यापैकीं कारवारला लागून असलेल्या मंगळूर (South Canara) जिल्ह्याच्या समुद्र किनाऱ्यानें मराठी भाषकांची वस्ती आहे. हा जिल्हा चार भाषांचा आहे. तेथली तुळुभाषा ही स्थानिक, बाकीच्या तीन्ही शेजारच्या भागांतून आल्या आहेत. तरीपण हा सुमारें अडीच लक्ष वस्तीचा महाराष्ट्रीय समाज निदान १५०० वर्षांहून (किती अधिक हें सांगणारें ऐतिहासिक साधन उपलब्ध नाहीं) प्राचीन आहे.

दक्षिण कानडा जिल्ह्यांतील भाषांची वाटणी व लोकसंख्याशीं प्रमाण.

| | | |
| --- | --- | --- |
| एकूण लोकसंख्या | १२७२२४१ | १०० % |
| तुळू (स्थानिक मध्यवर्ती) | ५६१६२३ | ४१·४% |
| मल्याळी (दक्षिणभागी) | २९८७४३ | २१·७% |
| मराठी (उत्तर व पश्चिमेकडे) | २४१८९० | १७·६% |
| कानडी (पूर्वेकडे) | २४४५५१ | १७·८% |

महाराष्ट्रीय अल्पसंख्य असलेल्या जिल्ह्यांतील महाराष्ट्रीय बहुसंख्य असलेले तालुके :— (ए) बेळगांव जिल्ह्यांतील ३ तालुके, (ऐ) कारवार जिल्ह्यांतील तीन तालुके, (अः) मध्यप्रांतांतील चार तालुके मिळून,

| क्षेत्र चौरस मैल | महाराष्ट्रभाषा भाषक संख्या | एकूण जनता |
| --- | --- | --- |
| ७२१० | ४३३६९० | ९१५००७ |

**एकसांधी एकावयवी सलग महाराष्ट्राचे संभाव्य** (अ ते ऊ आणि ए, ऐ, अः)

| **क्षेत्र चौरस मैल,** | **महाराष्ट्रभाषा भाषकांची संख्या,** | **एकूण लोकसंख्या** |
| --- | --- | --- |
| **१३३२८०** | **२०१९५५५९** | **२६३५९६९८** |

(ङ) सलग महाराष्ट्राला चिकटून असलेल्या अल्पसंख्य तालुक्यांतून मराठी भाषाभाषक बहुसंख्य गांवें असलेले तालुके (ओ) बेळगांवचे ३, कारवारचे ५, (औ) अक्कलकोटचा भाग, (अं) बारखाणी संस्थानचा भाग (क) बालाघाट जिल्ह्यांतील दोन तालुके व दुर्ग जिल्ह्यांतील एक, (ख) बस्तर संस्थान (ग) निजामचे तीन जिल्हे (घ) मंगळोर जिल्ह्यांतील भूभाग हे होत.

या ७ भागांतील मराठी भाषकांची संख्या ११०१८५६ आहे. प्रांत पुनर्रचनेबद्दल (सरहद्द कमिशन) चौकशी मंडळ नेमलें जाऊन कोणतीं गांवें महाराष्ट्राचीं हें तें चौकशी मंडळ निवडील. तें जीं गांवें महाराष्ट्राचीं ठरवील, त्यांचा समावेश महाराष्ट्राच्या राजकीय प्रांताच्या क्षेत्रांत झाला पाहिजे. ही दक्षता महाराष्ट्रानें घेतली नाहीं तर महाराष्ट्र १०००० चौरस मैल क्षेत्र, ११ लक्ष महाराष्ट्रीय बांधव यांना कायमचा मुकेल.

# मध्यमहाराष्ट्रांत असलेल्या परप्रांतियांचें (Domiciled) भाषकसंख्येच्या आधारें बलमापन

| प्रदेश | गुजराथी | हिंदी × | कानडी | तेलगु | भिल्ली | तामीळ | मल्याळी | एकूण महाराष्ट्रेतर भाषाभाषक | परप्रांतीय भाषाभाषकाचें महाराष्ट्र भाषाभाषकाशीं प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुंबईप्रांत | | | | | | | | | |
| मुंबई शहर | २४२४४३ | २०८३२३ | ८३०० | १७१४२ | ६ | १०२५२ | २४७४ | ५६७६२३ | ·९० |
| ठाणे जिल्हा | ७२३३७ | २९३९९ | ६६८ | १४३५ | ८० | ३८७ | ४८ | १०६९८३ | ·१४ |
| अहमदनगर जिल्हा | ३५४७ | ७४३६५ | १११७ | १६२४४ | १८९६७ | ९२३ | २१ | ११८१२२ | ·१३ |
| पूर्व खानदेश ,, | १९५३२ | १७२४१८ | ६५९ | ३९७७ | ३४१०९ | १८४ | ६७२० | २४१९१५ | ·२५ |
| पश्चिम खानदेश ,, | ४२०८९ | ५७४९४ | ७०२ | २२०५ | २६२८०० | ४३ | १० | ३७०३६८ | ·९० |
| नाशिक ,, | ६७५० | ७७६८८ | ७३५ | ३८०३ | ३८०८७ | ६५३ | २१ | १३२००० | ·१५ |
| पुणें ,, | १५२०१ | ७०२६८ | ४४५७ | ५५४५ | ३७७ | २४० | ११९३ | १३२७२३ | ·१२ |
| सातारा ,, | ४०४३ | ४२७१७ | १३६५२ | ५१२ | ३२ | ० | ८ | ६८४१४ | ·०६ |
| सोलापूर ,, | ५२७० | ७९२७२ | ६३३५२ | ४१३४६ | ९४७ | ९८७ | ११ | १९२३३३ | ·३० |
| मुंबई उपनगर ,, | २३७९५ | २४७९४ | १९९० | १७८७ | १५० | १३१० | २२१ | ६४०४३ | ·५० |
| कुलाबा ,, | ४०९७ | २२३६६ | २३१ | ३७१ | ० | १०८ | ११३ | २९०९८ | ·०५ |
| रत्नागिरी ,, | ९१० | ४९८०४ | ५२२ | ४०२ | ० | ५५ | २८ | ५३१४८ | ·०४ |

× हिंदींत पश्चिमहिंदी, राजस्थानी, पूर्वहिंदी या तीन बोलींचा अंतर्भाव केला आहे.

| | गुजराथी | हिंदी | गोंडी | तेलगु | भिल्ली | कोरकू | एकूण | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मध्यप्रांत | | | | | | | | |
| वर्धा जिल्हा | १७४९ | ५९०७२ | ४८७१८ | २३२० | २९३ | ५ | ११६१३५ | ·२९ |
| नागपूर ,, | ३६२४ | १४९७९५ | ५२१३९ | ९१७३ | ११८ | ० | २२७५१६ | ·३१ |
| चांदा ,, | १२९४ | २९१८५ | १०९८२२ | ६६७७९ | १४३ | ० | २११६८४ | ·३८ |
| भंडारा ,, | ३४४९ | १४४९८४ | ६००७८ | १५२१ | १ | ० | २१४३५६ | ·३१ |
| वऱ्हाड | | | | | | | | |
| उमरावती जिल्हा | ७३७६ | १४९०१६ | २०३३३ | २७३२ | २००१ | ३५४०० | २२०१७६ | ·३० |
| अकोला ,, | १०१३२ | १४७१३४ | १४८५ | ५१११ | ७५१ | १४१९ | १६८८१३ | ·२३ |
| बुलढाणा ,, | ६५२६ | १०४७१४ | २८३ | ४००१ | १०३२ | १२०७ | ११९४८६ | ·१८ |
| यवतमाळ ,, | ३९६२ | १३३८८७ | ६०७४७ | ३४५५२ | ७९७ | ० | २६११८८ | ·४३ |

| | गुजराथी | हिंदी | गोंडी | मारी | भत्री | उरीया | तेलगू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बस्तर संस्थान | १२३ | २३९०३ | २६२९८८ | १२०८०५ | ४५८३० | ४८१२९ | ११६६२ | ... | ... |

| मुंबई इलाख्यांतील संस्थानें | कानडी | भिल्ली | गुजराथी | हिंदी | महाराष्ट्रियेतर भाषा भाषकएकूण | महाराष्ट्र भाषा भाषकांशीं इतरांचें प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| जव्हार | ० | ० | ८१० | ४४५ | १२७६ | ·०२ |
| जंजिरा | २३ | ७५ | ८५७ | १२२९५ | १५७७९ | ·१९ |
| भोर | १६ | ० | ३८७ | ८९३ | २३०० | ·०१ |
| औंध | ५६४७ | ० | ६७५ | ४०४२ | ११०४१ | ·१७ |
| फलटण | ५२ | ० | ९०९ | १७७९ | ३०९९ | ·०५ |
| सावंतवाडी | १८८ | ० | १४ | ४६६१ | १०३४४ | ·०४ |
| कोल्हापूर | १४७०१८ | ० | २४०५ | ३८४४० | १९२८९१ | ·२५ |
| कुरुंदवाड मोठे | १७७३२ | ० | ३९२ | ४०२७ | २०४२९ | ·९ |
| कुरुंदवाड धाकटे | १५९४९ | ० | ७१ | ४६१५ | २१०८७ | १·१४ |
| मिरज मोठे | २४४४२ | ० | ४३३ | ११२२३ | ५६३६७ | ·६ |
| मिरज धाकटे | १६२७० | ० | ६३ | २४७३ | १९३४६ | ·९ |
| सांगली | ९८७५२ | ० | ८०१ | १९९८१ | ११८३५८ | ·८ |
| जत | ३५४९४ | ० | ३६ | ६२६२ | ४२६१२ | ·९ |
| वांसदा | ४ | ० | २१२४२ | ८२८ | २२१३० | ·८ |
| सुरगाणा | ० | ० | ४९ | १२३ | १७२ | ·०१ |
| धरमपूर | ० | १०५०८७ | ४०७५ | १३४१ | ४११३० | ·५ |
| डांग ( ब्रिटिश ) | ४ | ३२३५० | ७३१ | ४१ | १४८२८ | ·८ |
| डांग ( बडोदें ) | ... | ... | ... | ... | ... | ... |

| निजामराज्य | तेलगू | कानडी | उर्दू | हिंदी | गोंडी | गुजराथी | महाराष्ट्रीयेतर एकूण | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आदिलाबाद | ४६३५५८ | १०४०४ | ४१७०२ | २४७१ | ४९०८१ | २०६८ | ६०२५२१ | ... |
| | | | | | वंजारी २६२७६ | | | ... |
| निजामाबाद | ५४५१८८ | ५७६१ | ४५७३० | २८९० | १३१९६ | ७६० | ... | ... |
| औरंगाबाद | १६४५२ | ६३३७ | १२५६३२ | २८६९० | २२४६ | १०९९० | २०४१८९ | ·२ |
| बीड | ४६०९ | २२५५ | ५६६७१ | ८१४२ | ५२५४ | २४८१ | ८१०४८ | ·१५ |
| नांदेड | १२०४७७ | ३८१५५ | ८५२८५ | १४१७८ | ७००३ | १३१४ | २७१३६० | ·६ |
| परभणी | १३८५० | ५९११ | ९४३९६ | १८२५२ | ९२४३ | १३८३ | १४५०४० | ·२४ |
| गुलबर्गा | २३९७९६ | ६०४४०९ | १६५८६३ | ६११० | ३२९३ | २३५९ | १०२६०५८ | ... |
| उस्मानाबाद | १७९९४ | ३७०३० | ७३०३८ | ९५९१ | १९६२ | ३०२६ | १४४३१९ | ·२३ |
| रायचूर | २३७५५३ | ५९८५१० | ७९९२७ | २५६४ | ४८५६ | १४४२ | ९२६२७९ | ... |
| बीदर | १३३७८० | २६०७८२ | १३८४१६ | ४५१७ | ६६३८ | ८८२ | ५४५७७७ | ... |

# अल्पसंख्य ( सरहद्द ) महाराष्ट्र

महाराष्ट्र व इतर भाषांच्या सरहद्दीवरील जिल्ह्यांतून कोठें कोणते महाराष्ट्रेतर समाज महाराष्ट्रियांच्या मांडीस मांडी लावून बसले आहेत हें पाहणें अभ्यासाच्या दृष्टीनें हितावह आहे म्हणून देतों.

(१) पश्चिम खानदेश जिल्ह्याचे पश्चिमेकडील तालुके गुजराथला लागून आहेत व उत्तरेकडील तालुक्यांतून भिल्लांची वस्ती आहे. या जिल्ह्यांत गुजराथी ४२०८९ म्हणजे सुमारें ·०५ आहेत व भिल्ल २६२८०० सुमारें ·३४ आहेत व महाराष्ट्रभाषाभाषक ·५२ आहेत.

(२) मध्यप्रांतांतील सरहद्द जिल्ह्याचे आकडे ( अः ) व ( क ) छेदांत दिले आहेत. या भागांतील हिंदी भाषकाबद्दल शिरगणतिअहवाललेखकाचा शेरा असा आहे कीं तेथल्या बहुसंख्य हिंदी लोकांना महाराष्ट्र भाषा कळणें अवश्य आहे. पण अल्पसंख्य महाराष्ट्रियांचें हिंदीवांचून अडत नाहीं. महाराष्ट्र संस्कृतीची इतकी छाप हिंदी लोकांवर आहे.

(३) बस्तर संस्थान हळब समाजाचें आहे व ते बहुसंख्य आहेत. हळबांच्या मारिया व मूरीया या दोन पोट जातींच्या बोली निराळ्या दाखविल्यामुळें ते अल्पसंख्य वाटतात. हळबांची भाषा महाराष्ट्र भाषेची पोटबोली आहे. जे हळब नागपूर ते भंडाऱ्याच्या जंगलापर्यंत मला आढळले. त्यांची संस्कृति महाराष्ट्रीयच दिसली. जंगलाच्या गाभाऱ्यांत रहाणारे जंगली जातींच्या संगतीनें जंगली समाजाप्रमाणें वागतात इतकेंच. पण हा भाग महाराष्ट्राचा करणें, महाराष्ट्रानें आजपर्यंत दुर्लक्षिल्यामुळें दिवसेंदिवस अशक्यप्राय होत चाललें आहे.

(४) निजाम राज्यांतील आदिलाबाद व निजामाबाद या जिल्ह्यांपैकीं वायव्य दिशेकडील तालुके पूर्णतया महाराष्ट्रीय आहेत. निजामाबादमधील महाराष्ट्रीय ८३६९ ही शिरगणतीची नोंद चूक आहे. तेथें महाराष्ट्रीय एक लक्षाहून अधिक असावेत. या जिल्ह्याचें जुनें नांव इंदुरबोधन असें महाराष्ट्रीय होतें.

(५) गुलबर्ग्याचा वायव्य भाग महाराष्ट्रीय आहे व इतरत्र कानडीची सरमिसळ झालेली आहे.

(६) बीदर जिल्ह्यांत महाराष्ट्रीय ३७·५ कानडी २७·५ तेलगु १६·५ व इतर भाषांचे १८·५ याप्रमाणें बहुसंख्य महाराष्ट्रीय आहेत. निजामराज्यांतील चुकीच्या

नोंदीबद्दल सविस्तर माहिती दिल्लीच्या महाराष्ट्रविस्ताराच्या फेब्रुवारी १९४३ च्या पान ५० व ५१ वर दिली आहे.

(७) सोलापूर जिल्हा कर्नाटकचा आहे असा प्रवाद अलीकडे कन्नडिगांकडून केला जात आहे. त्यास उत्तर:—एकंदर जिल्ह्यांत कानडीचें लोकसंख्येशीं प्रमाण ·०७५ पडतें. एकूण ६३३५२ पैकीं $\frac{3}{4}$ कन्नडिग एका सोलापूर तालुक्यांत आहेत. व त्या तालुक्यांत ते महाराष्ट्रियांच्या $\frac{1}{2}$ आहेत.

(८) अक्कलकोट संस्थानांत कानडी मराठीचें प्रमाण ९:२ आहे.

(९) विजापूर जिल्ह्याच्या उत्तरेची कांहीं गांवें बहुसंख्य महाराष्ट्रियांचीं आहेत.

(१०) मंगळूर जिल्ह्यामधील १८ पगड महाराष्ट्रीय जातींची माहिती पुरुषार्थ मासिक वर्ष १३, अंक ९, पान ५०७ तें ५१२ वर पहावीं. कारवार ते गुलबर्गा जिल्ह्यांत सर्व जातींचे महाराष्ट्रीय स्थायी वस्तीचे आहेत. (कारवार जिल्ह्याची माहिती परिशिष्ट २ मध्यें पहावी.)

(११) दक्षिण कोकणीबद्दल महाराष्ट्र विद्यापीठ समितीस पाठविलेल्या प्रश्नोत्तरांपैकीं छेद १३ त माहिती आहे. (परिशिष्ट ३ रें पहावें.)

(१२) उत्तर कोकणीबद्दल माहिती त्याच उत्तरापैकीं १४ व्या छेदांत आहे.

(१३) इंदूर आणि बढवाणी संस्थानांतील महाराष्ट्रीय भागाबद्दलची माहिती रा. ब. सरदार माधवराव किबे M. A. (इंदूर) व कै. रा. ब. कोंडोपंत फाटक माजी दिवाण बढवाणी यांनीं दिली आहे ती:—(अ) इंदूर संस्थानांतील ढवळी, वरला, चाचरा, पाटी या भागांत महाराष्ट्रीय आहेत. हा ४००–४५० मैलाचा टापू सेंधवाच्या आग्नेयीस शिरपूर तालुक्याला लागून आहे. वाट सेंधव्याहून व इंदूरहून आहे.

(आ) बढवाणी संस्थानांतील खेटिया (पानसमल तहशील) हा भाग पूर्ण महाराष्ट्रीय आहे. शहादा आणि शिरपूर तालुक्यांना लागून आहे. १०००–१५०० घरें असतील.

रामगड किल्ल्याखालील हा भाग खानदेशी आहे. हा भाग तापी किनाऱ्याला आहे.

## परिशिष्ट १ लें

## डांग भागांतील कोकणासमाज व त्यांची भाषा

या कोकणा समाजाला आम्हीं महाराष्ट्रीय ओळखीतच नाहीं; वस्तुतः ते पुण्याच्या मावळ्यांचे भाऊबंद आहेत. यांना शिरगणति अहवाल लेखक व डॉ. ग्रीअरसन ( L. S. I. Vol IX Part III Pages 130-137 ) दोघेहि भिल्ल मानतात, व त्यांची भाषा भिल्लींत घालतात. असें असून सुद्धां प्रत्यक्ष नोंदींतील माहिती या सरकारी अधिकाऱ्याविरुद्ध आणि वस्तुस्थितिनिदर्शक आहे असें आढळतें.

### १९३१ च्या शिरगणति अहवालांतील आंकडे

| विभाग | क्षेत्र चौरस मैल | एकूण लोकसंख्या | महाराष्ट्रीय जातींची संख्या | महाराष्ट्रभाषा-भाषकसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ वांसदा | २१५ | ४८८३९ | २५७०० | २६७०९ |
| २ धरमपूर | ७०४ | ११२०६१ | ७११७१ | १५०९ |
| ३ डांग ( ब्रिटिश ) | ९६६ | ३३७४९ | १८९२० | ६३१ |
| ४ सुरगाणा | ३६० | १५२४५ | १४०९७ | १५०७३ |
| | | | १२९८८८ | ४३९२२ |
| | २२४५ | २०९८६४ | | १०२४७+ |
| ५ डांग ( गायकवाडी ) | ... | ... | ... | |

+ ही संख्या १९४१ च्या शिरगणतींतील आहे.

### महाराष्ट्रीय जातींची संख्या

| विभाग | मराठा | मराठा कोळी | दुबळा | कोकणा | वारळी | कातकरी | महार | मांग | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ वांसदा | ५८४६ | १७०२ | २६६ | ११६७८ | ५३१५ | ९०१ | ६८ | २४ | २५७०० |
| २ धरमपूर | ११०३ | ६१८१ | ९३४ | ३०३०० | ३१०८९ | ७३६ | ७४५ | ८३ | ७११७१ |
| ३ डांग ( ब्रि. ) | १४३३९ | ११ | ४० | ० | ४३५८ | ११० | ४६ | १६ | १८९२० |
| ४ सुरगाणा | ८८९१ | ४०१० | २१२ | ० | ९२६ | २२ | २ | ३४ | १४०९७ |
| | ३००७९ | ११९०४ | १४५२ | ४१९७८ | ४१६८८ | १७६९ | ८६१ | १५७ | १२९८८८ |

वरील दोन्ही कोष्टकें पाहिलीं म्हणजे पहिल्या चार विभागांत महाराष्ट्रियांची संख्या शेंकडा ६२ असतां त्यापैकीं फक्त शेंकडा ३३ महाराष्ट्रियांची मातृभाषा मराठी लागली असून शेंकडा ६७ महाराष्ट्रियांची मातृभाषा महाराष्ट्रियेतरांबरोबर नोंदली गेली. गायकवाडी डांगची लोकसंख्या कळली नसल्यानें त्यांचें प्रमाण सांगतां येत नाहीं. सुरगाणा व बांसदा या भागांतील महाराष्ट्रियांची भाषा बरोबर नोंदली गेली असें दिसतें.

वारळी व कातकरी या जाती, ठाणें व कुलाबा जिल्ह्यांतील आहेत. दुबळा समाज मुंबईकरांच्या परिचयाचा आहे. सुरत ते अहमदाबादपर्यंत यांची वस्ती असून त्यांची संस्कृति व भाषा महाराष्ट्रीय आहे. शिरगणतींत आणखी

किती चुका असतील परमेश्वर जाणें! सह्याद्रीच्या कुशींत पहुडणाऱ्या या साऱ्या महाराष्ट्रीय जाती आहेत. जव्हारपासून गायकवाडी डांग पर्यंतचा हा बहुसंख्य महाराष्ट्रियांचा प्रदेश महाराष्ट्रांत समाविष्ट पाहिजे.

हे कोकणे आपणा स्वत:स Consider themselves as superior to Bhils and say that their ancestors originnally came from Kokan. Their appearance resembles that of Kokan Thakars असें डॉ. ग्रीअरसेन सांगतो; व पुढें त्यांच्या भाषेबद्दल Kokani dialect is not uniform in all districts; as we proceed southward it approaches Marathi and in Dharampur, and Pieth Taluka of Nasik it might with equal right be classed as Marathi Dialect असें म्हणून या कोकणीला भिल्लींत घालतो. भिल्ल शेती करीत नाहींत; कोकणे शेती करतात. त्यांना पाटिलक्या व वतने आहेत. भिल्लांना तीं नाहींत. कोकण्यांना अज्ञान, दारिद्र्य व भिल्लांची संगत यामुळें भिल्ल मानलें गेलें आहे.

शिरगणतींतील नोंदीच्या आणखी चुका दाखविल्या म्हणजे माझ्या विधानाला अधिक पुष्टी येईल. डॉ. ग्रीअरसनच्या वरील कथनांत धरमपूरमधील कोकणी मराठींत धरली असली पाहिजे. त्या उलट १९३१ च्या शिरगणतींत तेथें कोकणे ३०३०००, तर मराठी भाषा बोलणारे १५०९ दिले आहेत व खुद्द भिल्ल १२४ असतांना भिल्ली बोलणारे १०५०८७ दाखविले आहेत. डांगमध्यें अशीच चुकी आहे. तेथें भिल्ल २४ व वन्य जाती ३६३४ असतांना भिल्ली बोलणारे ३२३५० व मराठे १४३३९ असतांना मराठी भाषा बोलणारे फक्त ६३१ दिले आहेत.

१९२१ चें मुंबई शिरगणतीचे लेखक लिहितात:—

As to this Bhili dialect one would expect it to be the language of Kokanas a caste with affinities to Bhils, but the 1911 figures of that caste did not give an exact approximation in the territorial distribution of the Bhili dialect of Kokani.

| Districts | Kokani Speakers | Kokani caste in :— | |
|---|---|---|---|
| | | 1911 | 1921 |
| Suragena State | 12350 | nil | not tabulated |
| Surat Agency | 92597 | 66181 | 43111 |

सरकारी लेखांतील आंकडे व माहिती चूक आहे हें वरील दोन्ही पुराव्यावरून सिद्ध होत आहे. या चुकांचें कारण वस्तुस्थिति नीट जाणून न घेतां, प्रथम चुकीचे तर्क केले आहेत व त्याच अनुरोधानें आंकडे व कोष्टकें तयार केलीं हें होय.

ही कोकणी म्हणजे गोव्याची कोकणी नव्हे. जव्हार-कुलाब्यांतील बोलीशीं हिचें साम्य आहे. मी हिला उत्तरकोकणी हें नांव दिलें आहे. ठाणें-रत्नागिरीची मध्यकोकणी व वेंगुर्ला-सावंतवाडी ते त्रिवेंद्रम्पर्यंतची दक्षिण कोकणी होय. माझ्या मतानें कोकणीचे असे तीन पोटभेद संभवतात.

## परिशिष्ट २ रें

## कारवार जिल्ह्यांतील मराठी-कानडीचें स्थान

( १ ) कारवार जिल्ह्यांतील मराठी पूर्वपरंपरागत असून कानडी उपरी आहे, व मराठीची हल्लीं हेळसांड होत आहे, ती दूर करावी म्हणून १९३९ मध्यें मुख्य प्रधान ना. खेर यांना कारवार म्युनिसिपालिटीनें दिलेलें मानपत्र, ( २ ) १९४१ च्या शिरगणती अधिकाऱ्यांनीं मराठीची योग्य नोंद करावी म्हणून केलेले प्रयत्न ( ३ ) १९३१ मध्यें भरलेल्या कन्नड साहित्य परिषद व एकीकरण परिषदप्रसंगी मराठीवर होणाऱ्या आक्रमणाविरुद्ध केलेले प्रयत्न, यांचे वृत्तांत १९४२ च्या महाराष्ट्रविस्तार मासिकांत सविस्तर प्रसिद्ध केले आहेत, ते पहावेत.

## परिशिष्ट ३ रें

## दक्षिण कोकणी

कोकणी ( गोवा-कारवार-मंगळूरची ) हिला मी दक्षिणकोकणी हें नांव देतों. हिला डॉ. ग्रीअरसननें प्रथम मराठीची म्हणून हि निराळी संबोधिली. या आधारावर १९३१ च्या शिरगणति अधिकाऱ्यांनीं हिला मराठींतून बाहेर काढली, मराठीची नव्हे असें ठरविलें.

( १ ) ही कोकणी ज्यांची खुद्द जन्मबोली आहे अशा वरील तिन्ही भागांतील सर्वमान्य विद्वान् कै. डॉ. सुकथनकर प्रभृतींनीं Memorandum on Kokani by the learned and influential citizen of Bombay, immigrated from Goa, Karwar and Mangalore, home of Kokani dialect of Marathi या नांवाची पुस्तिका शिरगणतीच्या मुख्याधिकाऱ्याकडे पाठविली होती. तींत ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिक व भाषाशास्त्रदृष्ट्या तिचें मराठीपण सिद्ध केलें आहे. ( २ ) कोकणी

मातृबोलीचे, गोवा जन्मभूमी असलेले प्रसिद्ध विद्वान् पंडित श्री. अ. का. प्रियोळकर यांनीं " गोमांतक सरस्वती " नांवाची पुस्तिका कोकणीवरील सर्व आक्षेप खोडून काढणारी प्रसिद्ध केली आहे. ( ३ ) महाराष्ट्र साहित्य परिषदेनें भाषाशास्त्रज्ञांची एक समिति नेमून डॉ. ग्रीअरसन व सेन्सस अधिकारी यांना उत्तर म्हणून एक शास्त्रदृष्ट्या चिकित्सक प्रबंध लिहिला आहे. या तीन्ही पुस्तकांच्या आधारें ही कोकणी मराठीचीच प्रादेशिक बोली आहे हें निश्चित मानलेंच पाहिजे. गोव्यांत सुमारें ६ लक्ष, मुंबई इलाख्यांत ९१४१९३ व मंगळूरचे सुमारें २$\frac{1}{4}$ लक्ष आणि मलबार, कोचीन, त्रावणकोर मधील सुमारें ४०००० मिळून १७$\frac{1}{2}$ लक्षाहून अधिक महाराष्ट्रियांची दक्षिण कोकणी ही मातृबोली म्हणजे घरांतील बोली असून त्यांची ग्रांथिक व सांस्कृतिक भाषा केन्द्रमराठी हीच आहे.

## परिशिष्ट ४ थें

## मऱ्हाटवाडा

मऱ्हाटवाड्यांतील बहुसंख्य जिल्हे म्हणजे औरंगाबाद, नांदेड, परभणी, बीड, उस्मानाबाद, याबद्दल बोलावयास नको, पण आदिलाबाद, निजामाबाद, बीदर व गुलबर्गा यांपैकीं किती व कोणते भाग महाराष्ट्रांत घ्यावयाचे हें नव्यानें ठरवावें लागणार आहे, पण त्याचें साधन जी शिरगणति तीच चुकीची झालेली आहे, त्याचीं प्रमाणें :—

### जनसंख्येच्या प्रमाणांत भाषक संख्येची वाढ नाहीं

| शिरगणती वर्ष | एकूण जनसंख्या | १८९१ च्या जनसंख्येशीं शेंकडा प्रमाण | महाराष्ट्रभाषा भाषक संख्या | १८९१ च्या महाराष्ट्र भाषा भाषक संख्येशीं शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १८९१ | ११५३७६४० | ... ... | ३४९३८५३ | ... ... |
| १९०१ | १११४१११४२ | ९६·५५ | २८९५८६४ | ८२·८८ |
| १९३१ | १४४३६१४८ | १२५·२० | ३७८६८३८ | १०८·३८ |

जनसंख्येची वाढ अथवा घट ज्या प्रमाणांत झाली असेल त्याच प्रमाणांत भाषक संख्येंत वाढ अथवा घट व्हावयास पाहिजे पण या कोष्टकावरून तसें दिसत नाहीं. नोंदणी चुकीची झाली असें म्हणावयास हा आधार मिळाला आहे. पुढील आणखी दोन कोष्टकांनीं शिरगणति अहवालांतील भाषक संख्या बरोबर नाहींत, चूक आहेत, हें अधिक स्पष्ट होईल.

### ४० वर्षांतील वाढ घट

| | १८९१ | १९३१ | शेंकडा वाढ |
|---|---|---|---|
| जनसंख्या | ११५३७६४० | १४४३६१४८ | १२५·२० |
| तेलगू भाषाभाषक | ५०३१०६९ | ६९७२५३४ | १३८·५८ |
| महाराष्ट्र भाषाभाषक | ३४९३८५३ | ३७८६८३८ | १०८·३८ |
| कानडी भाषाभाषक | १४५११०४६ | १६२००९४ | १११·६४ |

वाढीचें प्रमाण विषम आहे. जनसंख्येच्या वाढीच्या प्रमाणापेक्षां तेलगू १३ टक्क्यांनीं वाढली आणि महाराष्ट्रभाषा १७ टक्क्यांनीं व कानडी १४ टक्क्यांनीं कमी झाली. हे तीन्ही समाज तेथील स्थिरवस्तीचे असल्यानें ही वाढ व घट चुकीच्या शिरगणतीमुळें झालेली दिसत आहे.

### जिल्हावार महाराष्ट्र भाषा भाषक संख्येची घट व वाढ

| अल्पसंख्य जिल्हे | १९०१ चे | १९३१ | |
|---|---|---|---|
| | | वाढ | घट |
| हैद्राबाद शहर | १८५६३ | ... ... | १६३४४ |
| अत्राफ-इ-बाल्डा | ५७९० | १७९०३ | ... ... |
| करीमनगर | १८८२० | ... ... | ९५५४ |
| नालगोंडा | २५७५ | ३६६४ | ... ... |
| वारंगळ | १३७१८ | ... ... | १२६८९ |
| मेदक | ५३६१ | ८५४९ | ... ... |
| निजामाबाद | ५९११८ | ... ... | ८३६५ |
| महबूब नगर | ७४८२ | १२१८७ | ... ... |
| रायचूर | १०९८८ | ११२५८ | ... ... |
| आदिलाबाद | ७६५४७ | १५९५०९ | ... ... |
| गुलबर्गा | ४७०९६ | १९८९५० | ... ... |

वरील कोष्टकांतील आदिलाबाद, निजामाबाद व गुलबर्गा यांतील बऱ्हंश क्षेत्र महाराष्ट्रांत यावयाचें आहे. निजामाबादमधील महाराष्ट्रीयांची संख्या ५०००० नी घटलेली दिसते. मूळचा महाराष्ट्रीय जिल्हा इतका निस्तोष व्हावा हें कल्पनेला-सुद्धां मानवत नाहीं. तसेंच गुलबर्गा व आदिलाबादची वाढहि अनैसर्गिक आहे.

या शिरगणतीच्या चुकीला काय नांव द्यावें समजत नाहीं. त्या त्या घरीं समक्ष न जातां आपल्या घरीं बसून मन मानेल तशी नोंद केली, असें म्हटलें पाहिजे.

निजामराज्यांतील शिरगणाति विश्वसनीय नसून भाषाक्षेत्र निश्चित करतांना या संख्यांचा उपयोग करूं नये. शिरगणातिच पुन्हा केली पाहिजे.

## कानडी भाषाभाषक महाराष्ट्रीय

कानडीभाषा बोलणाऱ्या गुलबर्गा ते कारवारपर्यंतच्या कन्नडिग म्हणविणाऱ्यांना मी स्वकीय मानतों–कारण ते आमच्यापैकींच आहेत—म्हणून त्यांनीं विचार करावा या हेतूनें खालील गोष्टी मी त्यांच्या नजरेस आणतों. स्वतःला कन्नडिग म्हणविणाऱ्यास मुख्य आधार वाटतात ते :—

(१) नृपतुंगाच्या कविराजमर्गात धारवाड विजापूरची कानडी गाभ्यांतील म्हटलें आहे म्हणून हा भाग कर्नाटकचा व म्हणूनच ते आपणास कन्नडिग मानतात व (२) या भागांत मराठी पेशवाईमुळें आली, त्यापूर्वी नव्हती ही त्यांची समजूत; हे होत.

या त्यांच्या समजुतीविरुद्ध ऐतिहासिक पुरावा मी मांडतों; (१) राणीबेन्नूर येथील शक ११७४ मधील मराठी शिलालेख, (२) विजापूरच्या करिमुद्दीन मशीदीवरील शके १२४९ मधील मराठी शिलालेख, (३) आदिलशाहींतील इ. स. १४९१ ते १५७० मधील मराठी पत्रें व फर्मानें, (४) कुंदगोळ येथील यादींत शके १४९६ ते १५५५ पर्यंतची म्हणजे शहाजी पूर्वकालीन मोडी लिपींतील हकीकती, (५) इ. स. १६१५–१७ मध्यें निजामशहा व पूर्तुगीझ यांच्यामधील तहाच्या मराठी भाषेंतील व मोडी लिपींतील प्रति, (६) टिपूची मराठींतील निरूपें, (७) म्हैसूरच्या दिवाणांना टिपूनंतरच्या इंग्रजी सेनापतींनीं लिहिलेलीं मराठी पत्रें, (८) धारवाडचे नागेशशास्त्री उप्पनबेटगिरीकर याजकडील कुडली (म्हैसूर) मठातील टिपू व आदिलशाही कडील मराठी पत्रें, (९) कुंदगोळ (धारवाड) व कंपली (बळ्ळारी) गांवचे मराठींतील जमाखर्च, (१०) धारवाड, विजापूर, बेळगांव, जिल्ह्यांतील आज कानडी बोलणाऱ्या पण २–३ पिढ्यापूर्वी मराठी बोलणाऱ्या महाराष्ट्रीय जाती, (ही सर्व माहिती श्री. ग. ह. खरे यांचे १९३६ नोव्हेंबर व १९३८ मार्च चे सह्याद्रीचे अंकांतील लेख, कै. द. वि. आपटे लेखसंग्रह पान ११६–१७, आणि कॅंबेलकृत जिल्हा गॅझिटिअरें व इतरस्थळें यांतून घेतली आहे.) (११) म्हैसूर ग्याझिटीअर (१९३० आवृत्ति) चे लेखक हयवदनराव हे अस्सल कन्नडिग आहेत. ते सांगतात कीं कर्नाटकची मातृभूमि म्हैसूर होय, तरी तेथें ८ व्या शतकापूर्वीचें संस्कृत व प्राकृत मधील विपुल साहित्य आहे; शककालीन महाराष्ट्रींतील शिलालेख शिमोगा व चित्तलदुर्ग येथें

आहेत; तेथें वैदिक आर्यांच्या व्यवहारभाषा जैन प्रबळ होईपर्यंत संस्कृत व प्राकृत होत्या; जैनांनीं मूळच्या द्रविड रहिवाश्यांची भाषा आपल्या धर्मप्रसाराचें वाहन केली व जैनराजाश्रयामुळें तिला प्रोत्साहन मिळून ती लोकव्यवहारांत रूढ झाली. ८ व्या शतकाच्या सुमारास जैनांनींच तिचा उपयोग धर्मप्रसारासाठीं ग्रंथलेखनाकडे केला. पुढें लिंगायतांनीं तिला आपली धर्मभाषा म्हणून स्वीकारली. धर्मविरोध व राजसत्ता यांच्या पाठिंब्यामुळें कानडीचा प्रसार पुष्कळ झाला.

(१२) १० व्या शतकांतील श्रवण बेळगोळचा शिलालेख मराठींत आहे.

(१३) म्हैसूर जिल्ह्यांत मराठी लहान मुलांना शाळेंतून शिकविलें जाई असें शके १२१२ चा म्हणजे ज्ञानेश्वरसमकालीन [पहा Mysore and Coorg by Rice (1909) P. 179 and Epi. Car. Vol. III, Part I, P. 146.] शिलालेख सांगतो म्हणजे मराठी त्या काळीं तेथें प्रचलित लोक भाषा होती.

इतक्या इतिहासावरून (१) विजापूर, धारवाड व म्हैसूर या भागांतील मराठी पेशवे पूर्वकालीन आहे इतकेंच नव्हे तर, शहाजीच्या पूर्वींपासून म्हणजे १२ व्या शतकापासून चालू होती. याहून अधिक म्हणजे शकपूर्वकालीं तेथें वैदिकांच्या भाषा होत्या. (२) कानडी मूळच्या द्रविडांची भाषा जैनांनीं धर्मविरोधामुळें हातीं धरली व राजसत्तेमुळें प्रसार पावली व ग्रंथनिविष्ट झाली, ती संस्कृत व प्राकृत यांच्यानंतर होय. (३) म्हैसूरपर्यंत आर्यांपैकीं महाराष्ट्रियांची महाराष्ट्री भाषा चालू होती. (४) चालू मराठी कानडी बरोबर श्रवण बेळगोळपर्यंत १३ शतकापर्यंत होती. (५) नृपतुंगानें विजापूरच्या कानडीला गाभ्याची म्हटलें हें विधान डळमळीत होतें कीं पुढें ती धेडगुजरी झाली याचें उत्तर तज्ज्ञांनीं द्यावें. (६) पेशव्यांनीं मराठी तिकडे नेली हें विधान सपशेल चूक दिसतें. या सर्व ऐतिहासिक व पूर्वी (पान ३१) सांगितलेल्या सांस्कृतिक पुराव्यावरून मी यांना कानडी भाषा बोलणारे महाराष्ट्रीय म्हणतों.

मराठीच्या सरहद्दी गुजराथी, हिंदी, छत्तिसगडी, तेलगू, व मल्याळी इतक्या भाषांशीं कानडीप्रमाणेंच भिडल्या आहेत; तरीपण त्यापैकीं एकीशींहि महाराष्ट्रियांची सांस्कृतिक एकरूपता कानडी भाषकांच्या $\frac{1}{10}$ इतकी सुद्धां नाहीं. त्या सर्वांहून कानडीभाषाभाषकांचे संबंध अगदीं निराळ्या प्रकारचे म्हणजे एका आईबापाच्या कुशींतून जन्मलेल्या मुलांइतके म्हणजे सख्या भावांइतके नजीकचे आहेत. मराठी आणि कानडी बोलणारे आपण एकाच समाजशरीराचे डावे उजवे भाग आहोंत.

कानडी आपली भाषा म्हणणाऱ्यांना मराठीसुद्धां तितकीच स्वकीय वाटते याचें एक गमक येथें देतों :—

| मुंबई विद्यापीठाचीं परीक्षा केन्द्रें | १९३१ च्या शिरगणतींतील | | स्तंभ २ चें ३शीं शेंकडा प्रमाण | मुंबई विद्यापीठाच्या १९४२ मधील प्रवेश परीक्षेंत | | स्तंभ ५ चें ६शीं शेंकडा प्रमाण | स्तंभ ४ चें ७ शीं पटीचें प्रमाण सुमारें |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कानडी भाषाभाषक | मराठी भाषाभाषक | | कानडी प्रश्नपत्रिका लिहिणारे | मराठी प्रश्नपत्रिका लिहिणारे | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| बेळगांव | ६९५६०० | २७३२७५ | ३९·२८ | ३४० | ५२५ | १५४·४१ | ४ पट |
| धारवाड | ८६३९२४ | ४६०१८ | ५·३३ | ७३५ | १११ | १५·१० | ३ पट |
| सोलापूर | ६३३५२ | ६८५१८७ | १०८१·५५ | २ | ४९८ | २४९००·०० | २ १/२ पट |
| विजापूर | ७१२२२९ | २७४९६ | ३·८६ | ४०६ | १५६ | ३८·४७ | १२ पट |
| कारवार | २२९५६६ | १५८११९ | ६६·०० | २४१ | ३८ | १६·१८ | १/४ पट |
| कोल्हापूर | १४७०१८ | ७६४८८८ | ५२०·२२ | १७ | ६४९ | ४०१७·६४ | ७ पट |
| सांगली | ९८७५२ | १३६१७३ | १३७·९७ | ७ | ४२० | ५८५७·५४ | ४५ पट |

कारवार सोडून सर्वत्र अनेक कानडीभाषाभाषक मराठी भाषेचे अभ्यासक आहेत असें यावरून दिसतें.

## कानडी भाषाभाषकांना विनंति

बेळगांव ( १९४६ ) च्या महाराष्ट्रसाहित्यसंमेलनाच्यावेळीं यांनीं जो विवेक दाखविला त्याबद्दल त्यांचें मी अभिनंदन करतों. ते आपणास कन्नडिग म्हणवितात तें कितपत खरें आहे हें त्यांनीं पारखावें. कर्नाटकची भूमि म्हैसूरसंस्थान आहे व म्हैसूरचे जन्मजात आनुवंशिक रहिवासी, हे खरे अस्सल कन्नडिग होत. खरी कन्नडभाषा म्हैसूरची व गुलबर्गा ते कारवारची कानडी कमअस्सल घेडगुजरी, हें त्यांना नाकारतां येणार नाहीं. वंशदृष्टया व शरीरठेवणीचा विचार करतांना म्हैसूरीयांशीं यांचें विसदृशत्व स्पष्ट आहे. संस्कृतीचीं जितकीं गमकें यापूर्वी ( पान ३१ ) दिलीं आहेत तीं यांचीं सर्वतया महाराष्ट्रीय आहेत, म्हैसूरीयांशीं जमणार नाहींत. या सर्व पार्श्वभूमीचा त्यांनीं विचार करावा अशी त्यांना माझी विनंति आहे. मी त्यांना अस्सल महाराष्ट्रीय समजतों, तो त्यांची कानडी ही जन्मभाषा मान्य करून समजतों. धर्मांतरानें जैन, बुद्ध, ख्रिस्ती, मुसलमान असून सुद्धां ते जसे प्रांतियत्वानें महाराष्ट्रीय; धर्मानें जन्मजात इस्रायल, पारशी, सिद्दी असूनहि जसे ते प्रांतियतेनें महाराष्ट्रीय आणि आज महाराष्ट्रांत अनेक पिढ्या स्थायी झालेले गुजराथी, मारवाडी, इतर हिंदीभाषक हे जसे वास्तव्यानें (domiciled) महाराष्ट्रीय, तसेच हे, कानडी जन्मभाषा असलेले गुलबर्गा ते कारवारपर्यंतचे

जन्मजात Indigenous महाराष्ट्रीय आहेत असेंच कोणालाहि विचारांतीं पटावें. यांच्या विचार-बुद्धीला माझें आवाहन आहे.

यांना मी महाराष्ट्रीय म्हणत असून सुद्धां महाराष्ट्रप्रांताच्या क्षेत्रांतून गुलबर्गा-विजापूर-धारवाड जिल्हे व बेळगांव-कारवारचा पूर्वभाग वगळला आहे व महाराष्ट्रियांच्या संख्येंत यांना जमा धरलें नाहीं हें त्यांच्या लक्षांत येईलच.

---

## भाषिक महाराष्ट्र योजना (संक्षिप्त रूपानें)

सुमारें १३ वर्षांपूर्वी दिल्लीस 'बृहन्महाराष्ट्रीय' मासिक चालवीत असतांना व नंतर स्वकीयांविषयीं माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत असतांना असें आढळून आलें कीं शासन-संस्थापुरस्कृत पुस्तकांतून अथवा वैयक्तिक ग्रंथांतून महाराष्ट्रविषयक माहिती संपूर्ण, सर्वांगिण व अचूक अशी कोठेंच नाहीं. जी थोडी आहे ती अव्यवस्थित व अपूर्ण असून केव्हां विपर्यस्तताहि आहे. भरतखंडाचा जो प्राचीन लौकिक आहे, त्याची भाषिक, साहित्यिक, राजकीय व सांस्कृतिक घडण बरीचशी पुढारलेल्या महाराष्ट्राकडून झालेली आहे, म्हणून भरतखंडाच्या भविष्यकालीन उज्वलतेचा बराच वाटा महाराष्ट्रानें उचलावा हें क्रमप्राप्त आहे. ह्यासाठीं व महाराष्ट्रानें स्वतःचे गुणदोष व स्वसामर्थ्य यांच्या निरीक्षणासाठीं, भावी कालांतील स्वहित रक्षणासाठीं व स्वतःस उच्च स्थान संपादण्यासाठीं मार्गदर्शक आरसा म्हणून स्वतःचा गतेतिहास समजून घेणें अत्यावश्यक आहे. आजचा एकेक मानव समाज हा त्याच्या पूर्वजांच्या नुसत्या रक्तमांसाचा आनुवंशिक वारसच नव्हे तर सांस्कृतिक, गुणदोषात्मक, परिस्थितिजन्य, भौगोलिक व नैसर्गिक अशा अनेक प्रकारांनीं विशिष्टत्व पावलेला व घडत आलेला आधुनिक वंशज आहे. याच कारणामुळें मूळचा एक मानवसमूह अनेकत्व व विविधत्व पावला. याच कारणामुळें व विशिष्ट गुणामुळें महाराष्ट्र निराळा जन्मास आला व तेव्हांपासून पुढारलेला आहे. तो कां व कसा झाला हें सांगणें इतिहासाचें काम आहे. हेंच काम "भाषिक महाराष्ट्र" या ग्रंथद्वारें करावयाचें आहे व बृहन्महाराष्ट्रीय कार्यालय—पुरस्कृत "भाषिक महाराष्ट्र मंडळ" ही या इतिहासाचें संशोधन, लेखन व प्रकाशन करणारी संस्था स्थापन होत आहे.

गेल्या १३ वर्षांच्या ग्रंथाभ्यासानें, विचारविनिमयानें व प्रत्यक्षावलोकनानें (Surveys and researches) आजच्या ज्ञानांतील व समजुतींतील चुका व विपर्यस्तता कळून आली व त्याचेंच प्रत्यंतर जुन्या समजुती व ज्ञान चुकीचें ठरलें.

ठळकपणें सांगतां येणारीं व सामान्य दृष्टीला पटणारीं कामें झालीं तीं :—(१) गुजराथ, काठेवाड, माळवा, राजपुताना, कोसल, त्रिलिंग, कुंतल, कर्नाटक, म्हैसूर, निजामराज्य, यांचें ८०० वर्षांपूर्वी महाराष्ट्रीयत्व, (२) अनेक जातींचा व भाषा-प्रकारांचा इतिहास, (३) सभोंवतालच्या भाषा विभागांतून झालेलें जातीय दळण-वळण, (४) महाराष्ट्रियेतर समजल्या जात नसलेल्या अनेक समाजांचें महाराष्ट्रीयत्व (५) अर्वाचीन महाराष्ट्राचा क्षेत्रविस्तार व संख्याबळ, (६) प्राचीन महाराष्ट्राचें ६ व्या आणि १३ व्या शतकांतील क्षेत्रनिश्चितीकरण, (७) कोंकणी-खानदेशी बोली महाराष्ट्र भाषेंतून काढून टाकल्या, ही हानी महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या नजरेस आणून त्यासंबंधीं करविलेले प्रयत्न, (८) १९४१ च्या शिरगणति अधिकाऱ्यांना तिच्या पद्धतींतील व जमविल्या जाणाऱ्या माहितींतील चुका दाखवून दुरुस्त करण्याचे केलेले प्रयत्न—मुलाखती, पत्रव्यवहार व लेख.

आजवर झालेलीं अभ्यासात्मक, संशोधनात्मक, व्यावहारिक व प्रचारात्मक कामें हीं अगदीं प्राथमिक अवस्थेंतील आहेत. त्यांतून अनेक विषयांची नुसती तोंडओळख झालेली आहे. निरनिराळ्या शास्त्रशाखातज्ज्ञांकडून त्या त्या विषयांचें अभ्यासपूर्वक व चिकित्सापूर्ण निरीक्षण व परीक्षण झालें पाहिजे, तरच त्यांची मांडणी व लेखन शास्त्रशुद्ध व निर्दोष होईल. आजवरचीं कामें संशोधकांच्या व लोकाग्रणींच्या प्रोत्साहनाचें तसेंच आजवर झालेल्या सुमारें रु. १८००० खर्चापैकीं देणगी व कर्जरूपानें अजमासें रु. १३००० च्या आर्थिक मदतीचें फळ आहे.

आज हें काम इतक्या थराला आलें आहे व अडचणी इतक्या आहेत कीं:– (१) हें काम यापुढें एक हातीं राहूं नये, (२) ज्ञानाच्या पांच सहा शाखांतून अभ्यास व संशोधन करावें लागतें व तें सर्व एकाच वेळीं सहविचारानें चाललें तरच त्यांतून निघणारे निष्कर्ष प्रमाणभूत होऊं शकतील. अशा तज्ज्ञांची जोड आजवर घेतां आली नाहीं; त्यामुळें अनेक विषय अपुरे सोडून द्यावे लागले आहेत, (३) हें काम करण्यासाठीं स्वतःचें स्थळ नाहीं, (४) हें सर्व घडवून आणणारी चालक संस्था जें "भाषिक महाराष्ट्र मंडळ" त्याला विधिबद्ध व निधिसिद्ध करावयाचें आहे, (५) हीं सर्व कामें करण्यासाठीं **"भाषिक महाराष्ट्र मंडळ नियोजक समिति,"** ही संस्था अधिकारारूढ झाली आहे. (अधिक माहितीसाठीं मोठें योजनापत्रक मागवावें.)

# आगामी ग्रंथांची सिद्धता

(२) *Historical Researches in the Ancient Maharashtra*
Papers read before the Annual Gatherings of the Orientalists, bringing to light new aspects of the ancient history of Maharashtra.

(३) **प्राक्कालिन महाराष्ट्र**
प्राच्यविद्या संशोधन परिषदामधून जे संशोधनात्मक निबंध वाचले त्या व इतर सामग्रींतून महाराष्ट्राचा प्राचीन इंतिहास.

(४) **संशोधन ( त्रुटित ) फळे**
गेल्या १३ वर्षांच्या संशोधनामुळें महाराष्ट्राच्या इतिहासाच्या अंगोपांगावर नवीन प्रकाश पाडणाऱ्या विविधविषयावरील प्रकाशित व अप्रकाशित लेख

(५) **भूचित्रावली**
संशोधनांतून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारें महाराष्ट्र विषयक २९ भूचित्रें

(६) **भारतीय शिरगणति**
दशवार्षिक शिरगणतीसाठीं ज्या नोंदी घेतल्या जातात व त्यावरून जी कोष्टकें तयार करून देशस्थितीच्या अंगोपांगाचें मूल्यमापन केलें जातें, त्याच्या प्रचलित पद्धतींतील १९४१ च्या शिरगणतीच्या प्रसंगीं दोष दाखविण्यासाठीं सुधारणा सुचविणारे लेख लिहिले, पत्रव्यवहार करावा लागला व मुलाखत घेतली, त्यांचा संग्रह. १९५१ च्या आगामी शिरगणतीच्या वेळी या सूचनांचा उपयोग होणार आहे.

(७) **बृहन्महाराष्ट्र**
( १ ) व्याख्या–विस्तार–जनसंख्या ( २ ) बृहन्महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास ( ३ ) उपयुक्तता–कार्य–शंका–त्यांचें निरसन ( ४ ) बृहन्महाराष्ट्रांतील इतिहास संशोधन (५) चळवळीचा इतिहास (६) पुढील वाटा.

(८) **महाराष्ट्र भाषेच्या बोली**
महाराष्ट्र भाषेच्या १७६ बोली महाराष्ट्राचे भौगोलिक, पंथविषयक, सांस्कृतिक व राजकीयज्ञान देतातच; शिवाय अदमासें ५० धंदे व ३० जातींचा इतिहास कळतो आणि महाराष्ट्र भाषेच्या वाङ्मयीन पराक्रमावर प्रकाश पडतो.

# भाषिक महाराष्ट्र मंडळ नियोजक समितीचे पदाधिकारी

सल्लागार—ना. डॉ. मु. रा. जयकर, पी. सी.

कार्याध्यक्ष—रा. ब. का. ना. दीक्षित, माजी डायरेक्टर जनरल, पुराण संशोधन खातें.

कार्यवाह १:—डॉ. रा. ना. दांडेकर, एम्. ए., पी एच. डी.

२:—शं. रा. शेंडे, या योजनेचे कल्पक व चालक.

सभासद १ डॉ. प. ल. वैद्य, डी. लिट्. २ प्रा. प. कृ गोडे

३ डॉ. सु. मं. कत्रे, एम्. ए., पी एच. डी.

४ म. म. द. वा. पोतदार ५ रा. ब. के. वि. गोडबोले

६ रा. सा. ना. गो. चापेकर ७ आचार्य ज. र. घारपुरे.

निधिधारक १ आचार्य ज. र. घारपुरे २ श्री. श्री. ग. वझे.

—:०:—

## भाषिक महाराष्ट्र योजनेचे अभीष्टचिंतक

१ स्व. आचार्य वै. का. राजवाडे २ डॉ. धों. के. कर्वे

३ डॉ. सर र. पु. परांजपे ४ श्री. सरदार मा. वि. किबे

५ श्री. द. आ. तुळजापूरकर ६ डी. रा. ह. भडकमकर, एम्. डी.